अंक १२ वा  २०२१-२२



# ॥ ज्ञानपंढरी ॥



॥ विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान ॥

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित

## दिलीप वळसे पाटील

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय


मु.पो.निमगाव सावा, ता.जुन्नर, जि.पुणे ४१० ५०४  ७५१७२३७३३३/८३१७२३७३३३

संस्थापक-अध्यक्ष: मा.श्री.पांडुरंगजी पवार (M.Com.) मा.उपाध्यक्ष, जि.प.पुणे.

Website: www.dvpcollege.com  Email: dpc_nimgaonsawa@rediffmail.com



* महाराष्ट्र शासन नोंदणी क्र.एन.जी.सी.२००९/(१५२/०९) मशि-०४ दि.११/०७/२००९ * पुणे विद्यापीठ आय.डी.क्र.पी.यु./पी.एन./ए.सी.एस./३३८/२००९



मा.ना.दिलीपरावजी वळसे पाटील

मा.गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य



# मा.श्री.पांडुरंगजी पवार साहेब

विद्यमान सदस्य, जि.प.पुणे, संस्थापक-श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठाण

!! विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान !!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित

# दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा


प्रा.प्रल्हाद शिंदे
प्राचार्य


प्रा.प्रकाश कांबळे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.डॉ.शाकुराव कोरडे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.पडवळ अनिल
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.प्रियंका डुकरे
सहाय्यक प्राध्यापक



प्रा.प्रविण गोरडे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.डॉ.दत्तात्रय चव्हाण
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.शितल कांबळे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.शिवाजी साळवे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.मुन्ना मणियार
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.आशिष घाडगे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.ज्योती अहिनवे
सहाय्यक प्राध्यापिका


प्रा.मंगल उनवणे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.आहेर नंदा
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.रोहिणी काटे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.छाया चक्कर
सहाय्यक प्राध्यापिका


प्रा.सुजाता येंधे
सहाय्यक प्राध्यापक


प्रा.नयना पावडे
सहाय्यक प्राध्यापक


श्री.गोविंद गाडगे
कार्यालयीन अधिक्षक


श्री.विजय लामखडे
लेखापाल


श्री.योगेश देवकर
लॅब असिस्टंट


श्री.शांताराम गाडगे
शिक्षकेत्तर कर्मचारी


सौ.कमल उनवणे
शिक्षकेत्तर कर्मचारी

विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित

**श्री. पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित**

# दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>निमगाव सावा, ता. जुन्नर जि. पुणे, पिन ४१०५०४ |
| **नियतकाळ** | : | वार्षिक |
| **प्रकाशकाचे नाव** | : | प्राचार्य श्री.प्रल्हाद सुरेश शिंदे M.A.,NET |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>निमगाव सावा, ता. जुन्नर जि. पुणे, पिन ४१०५०४ |
| **मालकी** | : | प्राचार्य श्री.प्रल्हाद सुरेश शिंदे<br>श्री. पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित<br>दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>निमगाव सावा, ता. जुन्नर जि. पुणे, पिन ४१०५०४ |
| **मुद्रकाचे नाव** | : | बालाजी एंटरप्रायजेस, मंचर |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | मु.पो.निमगाव सावा, ता. जुन्नर जि. पुणे, पिन ४१०५०४ |

मी असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुती खरा आहे. या नियतकालिकातील मजकुरांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**● प्रकाशक ●**

प्राचार्य श्री.प्रल्हाद सुरेश शिंदे

विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान!
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित
**श्री. पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित**

# दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा

❑ **ज्ञानपंढरी**
वार्षिक नियतकालिक (अंक १२ वा)
संपादक मंडळ

❑ **प्राचार्य श्री.प्रल्हाद सुरेश शिंदे**
अध्यक्ष

❑ **प्रा.डॉ.शाकुराव गंगाराम कोरडे**
संपादक

❑ **शाखा निहाय प्राध्यापक**
डॉ.दत्तात्रय चव्हाण
प्रा. अहिनवे ज्येती
प्रा. गोरडे प्रविण

❑ **संपादकीय सहाय्यक**
प्रा. कांबळे प्रकाश

❑ **कार्यालय प्रमुख**
मा. गोविंद खंडू गाडगे

❑ **महिला प्रतिनिधी**
प्रा. येंधे सुजाता

❑ **ग्रंथपाल**
सौ.मंगल सुधाकर उनवणे

❑ **परिचर**
मा. शांताराम प्रभाकर गाडगे
मा. कमल श्रीराम उनवणे

❑ **विद्यार्थी प्रतिनिधी**
कु.डुकरे गौरी दत्तात्रय

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | अध्यक्षीय मनोगत | ४ |
| २ | संपादकीय | ५ |
| ३ | अँटी रॅगिंग कमिटी | ६ |
| ४ | मराठी विभाग | ७-३८ |
| ५ | इंग्रजी विभाग | ३९-५० |
| ६ | अहवाल विभाग | ५१-५८ |
| ७ | कायमचे स्फुर्तिदाते | ५९-६५ |



# प्राचार्य मनोगत

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठाण संचलित, दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या ज्ञानपंढरी हा १२ वा वार्षिक अंक आपणा हाती सोपवताना मला सार्थ अभिमान व मन:पूर्वक आनंद होत आहे. दि.२७/०७/२००९ मध्ये लावलेल्या या महाविद्यालय रुपी रोपट्याने पाहता पाहता १० वर्ष यशस्वीरित्या पूर्ण केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने व विघ्नहर्ता गणेशाच्या आशिर्वादाने पावन झालेल्या जुन्नर तालुक्याच्या पवित्र भूमीच्या पूर्व पट्ट्यात स्थापन झालेल्या या महाविद्यालयाची वाटचाल कोणत्याही अनुदानित महाविद्यालयाला तोडीस तोड अशी आहे.

आपल्या भागाचा सामाजिक, आर्थिक विकासाबरोबरच शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने साहेबांनी या महाविद्यालयाची स्थापना करुन शिक्षणापासून वंचित असलेल्या या भागात गरीब, होतकरू व शिक्षणाची दुर्दम्य प्रबळ इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय केली. सन २००९ साली या महाविद्यालयात केवळ ११७ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. परंतु आज कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखांमध्ये ७२४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत एम.एम.मराठी हा अभ्यासक्रम देखील सुरु केला आहे व आज या विभागामध्ये ३३ विद्यार्थी प्रेविशीत आहे. एकूण १५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

ज्या भागात उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना २० ते २५ कि.मी अंतर प्रवास करावा लागत होता.

अनेक विद्यार्थी या त्रासामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहत होते. मुलींना शिक्षणाची इच्छा असूनही शिक्षणाची दारे बंद होती. परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थी ज्ञानगंगेच्या गुडघाभर पाण्यात देखीत जाऊ शकत नव्हते. अशा विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष आणि विद्यमान सदस्य आदरणीय पांडुरंगजी पवार साहेबांनी केले व दिलीप वळसे पाटील महाविद्यालयाची स्थापना करुन वाळवंटात फुलबाग फुलविली.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, त्यांच्यातील सुप्त कौशल्यांना वाव देण्यासाठी ज्ञानपंढरी या अंकातून विविध लेख, कविता, कथा, वैचारीक लेखन इत्यार्दीच्या माध्यमातून त्यांच्या विचारांना प्रवाहित केले जाते व ज्ञान पंढरीच्या माध्यमातून त्यांना प्रकाशित केले जाते.

चालू शैक्षणिक वर्षामध्ये ज्ञानपंढरी हा अंक तयार करण्याची जबाबदारी नव्यानेच प्रा.डॉ.शाकुराव कोरडे यांच्याकडे सोपविली व त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे, निष्ठेने, परीश्रमपूर्वकरित्या पार पाडली, या कामी त्यांना प्रा.कांबळे प्रकाश यांचे विशेष सहकार्य लाभले. त्याबद्दल या सर्वांना विशेष धन्यवाद व या अंकाच्या कामी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे मन:पूर्वक आभार आणि महाविद्यायलातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनींना भावी वाटचालीस महाविद्यालयाच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

प्राचार्य,

**प्रा.प्रल्हाद सुरेश शिंदे**

M.A., NET

# संपादकीय

परशुरामाने नि:शस्त्र केल्याने की काय पण हजारो वर्षे जो समाज फक्त जनावराप्रमाणे अत्याचार सहन करत होता. त्याच परशुरामाच्या भूमीवरील लोकांमध्ये खरे प्राण फुंकणाऱ्या, अभिषेक पात्रातून जलधारांच्या सततच्या वर्षाखालील नितळ शिवलिंगाप्रमाणे रूप लाभलेल्या, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकीय व सामाजिक अस्मितेचा केंद्रबिंदू असणाऱ्या त्या सह्याद्रीच्या शिवाने ज्या भूमीत जन्म घेतला आणि पृथ्वीतलावर आपले पहिले दुड दुडणारे पाऊल ज्या भूमीवर टाकून सूर्याच्या अस्तित्त्वापर्यंत जी भूमी पवित्र व विघ्नहर्त्याच्या आशीर्वादाने ज्या भुमीने अनेक विघ्नाचा समाना केला त्याच जुन्नर तालुक्यातील पूर्व भागातील पण अवर्षण भागात विकासाचे वारे बराच काळ फिरकलेच नव्हते, असा हा दुर्लक्षित भाग ज्यांच्या विशेष प्रयत्नातून आज प्रगतीच्या वाटेवर धावत आहे व विकासाची फळे चाखत आहे त्या मा.ना.श्री.दिलीपरावजी वळसे पाटील साहेबांच्या नावाने सुरु झालेले पूर्व भागातील हे महाविद्यालय आपली मुळे खोलवर रुजवून ताठ मानेने खंबीरपणे वाढताना आपले जणू बारसेच साजरे करीत आहे.

जुन्नरच्या पूर्व पट्ट्यांचा रूपरंग बदलण्यात यशस्वी ठरलेलं या ठिकाणचं लोकनेतृत्त्व म्हणजे मा.श्री.पांडुरंगजी पवार साहेब (मा.उपाध्यक्ष/सदस्य, जि.प.पुणे) ज्यांनी विकासाची गंगा येथे आणली. या ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी १९९६ मध्ये श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठानची स्थापना करुन विविध समाजपयोगी उपक्रम राबविले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सुविधा केल्यावर उच्च शिक्षणाच्या सोय अभावी येथील मुलं-मुली घरीच राहत होती. त्यासाठी उच्च शिक्षणाची गरज ओळखून ह्याच संस्थेच्या माध्यमातून मा.श्री.पांडुरंग पवार साहेब मा.उपाध्यक्ष/सदस्य, जि.प.पुणे व त्यांचे सर्व सहकारी जे उन्हा-तान्हात कष्ट करुन घामाचे मोती गाळत आहेत व जे बाहेर गावी राहूनही आपल्या जन्मभूमीशी नाळ अजूनही जोडून आहेत. त्या सर्व शिलेदारांनी आपले श्रमाचे लावून मा.श्री.दिलीपरावजी वळसे पाटील (कामगार व राज्य उत्पादन शुल्क मंत्री महा.राज्य, मुंबई) यांच्या प्रयत्नातून २००९-१० या शैक्षणिक वर्षात दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे रोपटे लावले व शेकडो विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केली.

अशा या महाविद्यालयाचा वार्षिक अंक विद्यापीठ नियमानुसार काढणे आवश्यक होते. यात विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यासह संस्थेनेही विशेष रस दाखवून पूर्ण सहकार्याची हमी दिली. पहिल्याच आवृत्तीच्या या अंकांच्या नावासाठी सर्वांकडून प्रस्ताव मागविण्यात आले. विद्येच्या माहेरघरात, पंढरीच्या महाविद्यालयात म्हणजे या परिसरात हे महाविद्यालय म्हणजे ज्ञानाची पंढरीच ठरणार असल्याने सुचवलेले ज्ञानपंढरी हे शिर्षक सर्वानुमते निवडल्यामुळे मी सर्वांचा आभारी आहोत.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा विविध योजना व अभ्यासामधील उत्साही सहभाग व गरज प्राध्यापक व संस्था यांचा उत्साह वाढविणारा आहे. म्हणून पुढील वर्षात संस्था कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान व वाणिज्य शाखा तर वरिष्ठ महाविद्यालयीन कला, वाणिज्य व विज्ञान या शाखा सुसज्ज भव्य व निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या नव्या इमारतीमध्ये सुरु करीत आहे. त्यात आपल्या सुचना, मार्गदर्शन व आशीर्वादांची अपेक्षा आहे.

या अंकाच्या निर्मितीत संस्था महाविद्यालयाचे प्राचार्य व संपादक मंडळाचे अध्यक्ष मा.डॉ.विलास श्रीधर जोशी सर इतर सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य लाभले.

प्रेरणादायी व आदर्श अशा संस्था कार्याचे व तज्ज्ञ अनुभवी सेवकांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्त्वाच्या कार्याचे समग्र दर्शन घडविणारा, अनेकांच्या सह्रदय बहुमोल सहकार्याने साकार झालेला हा ज्ञानपंढरी अंक निश्चितच वाचनीय व संग्राह्य स्वरुपाचा ठरेल याची खात्री वाटते. आपल्या सुचनांचे अभिनंदमय... सर्वांचे पुनश्च एकदा हार्दिक आभार....धन्यवाद!!!

संपादक

**प्रा.डॉ.शाकुराव गंगाराम कोरडे**

## अँटी रॅगिंग कमिटी

सन २०१९-२०

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा.डॉ.जोशी व्ही.एस. | प्राचार्य | अध्यक्ष |
| २) | श्री.गणपत घोडे | संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | श्री.जिजाभाऊ थोरात | समाजसेवक | सदस्य |
| ४) | प्रा.प्रकाश कांबळे | प्राध्यापक प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | प्रा.दर्शन शेलार | विद्यार्थी विकास अधिकारी | सदस्य |
| ६) | प्रा.अनिल कांबळे | कला शाखा प्रतिनिधी | सदस्य |
| ७) | प्रा.ज्योती अहिनवे | वाणिज्य शाखा प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | पा.राजेंद्र जगताप | विज्ञान शाखा प्रतिनिधी | सदस्य |
| ९) | प्रा.छाया गायकवाड | प्राध्यापिका प्रतिनिधी | सदस्य |
| १०) | श्री.गोविंद गाडगे | शिक्षकेत्तर सेवक प्रतिनिधी | सदस्य |
| ११) | कु.प्रांजल विश्वासराव | विद्यार्थीनी प्रतिनिधी | सदस्य |
| १२) | कु.स्वप्नील थिटे | विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |

## अँटी रॅगिंग कमिटी

सन २०२०-२१

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा.डॉ.जोशी व्ही.एस. | प्राचार्य | अध्यक्ष |
| २) | श्री.गणपत घोडे | संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | श्री.जिजाभाऊ थोरात | समाजसेवक | सदस्य |
| ४) | प्रा.प्रकाश कांबळे | प्राध्यापक प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | प्रा.दर्शन शेलार | विद्यार्थी विकास अधिकारी | सदस्य |
| ६) | प्रा.अनिल कांबळे | कला शाखा प्रतिनिधी | सदस्य |
| ७) | प्रा.ज्योती अहिनवे | वाणिज्य शाखा प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | पा.राजेंद्र जगताप | विज्ञान शाखा प्रतिनिधी | सदस्य |
| ९) | प्रा.छाया गायकवाड | प्राध्यापिका प्रतिनिधी | सदस्य |
| १०) | श्री.गोविंद गाडगे | शिक्षकेत्तर सेवक प्रतिनिधी | सदस्य |
| ११) | कु.डुकरे गौरी | विद्यार्थीनी प्रतिनिधी | सदस्य |
| | | | |

# मराठी विभाग

# संस्कारक्षम शिक्षण...

अज्ञानाच्या अवकाशाचा छेद घेण्यासाठी विद्यादान करण्यासाठी मा.श्री.पांडुरंगजी पवार सा़ो. साहेबांनी जो वृक्ष उभा केला आहे त्याचे काही दिवसांनी वटवृक्षात रुपांतर होईल अशी माझी मनोमन इच्छा आहे. ज्ञान ही शक्ती आहे. शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे. आज जगावर आपण राज्य करणारे भाकीत करत आहोत. त्यासाठी संस्कारक्षम शिक्षणाची अत्यंत गरज आहे. ज्ञानानेच मोठे होता येते. आर्थिक संपत्ती येते. मानवी प्रतिष्ठा ही लाभते. आपण समाजातील माणुसकी जपली तरच आपले शिक्षण हे श्रेष्ठ असेल.

भारतीय संस्कृती अंत:करण आणि बुद्धी यांची पूजा करणारी आहे. उदारता आणि निर्मरछता यांना प्राधान्य देणारी आहे. शिक्षण हे कृतीयुक्त व संस्कारांनी प्रेरीत झालेले असावे. त्यामुळे उद्याचा भारत 'सुजलाम–सुफलाम' आपल्याला पहावयास मिळेल शिक्षणाला संस्कारांची उत्तम जोड असेल तर भ्रषचाराचा असणारा भस्मासूर ही कधीच निर्माण होणार नाही. पृथ्वीचे नंदनवन करण्यासाठी संस्कारक्षम शिक्षणाची अत्यंत गरज आहे. आशावादी मनुष्य नेहमी एक नवी स्फुर्ती व शक्ती घेऊन वावरत असतो. तो शांततापूर्ण व सफल जीवनासाठी भरारी एवढेच ज्ञानाला महत्त्व देतो. ज्ञानानेच संयम माणसाजवळ निर्माण होतो. संयमी जीवन माणसाला कायमचे सुप्रतिष्ठीत करते. संयम हा तर भारतीय संस्कृतीचा आत्मा मानला जातो.

यशस्वी जीवनाचे खरे तत्त्व म्हणजे संस्कारक्षम शिक्षण होय. कर्तव्याची जाण आजच्या पिढीतील मुलांना व पालकांना होणे गरजेचे आहे. आपण आपल्या कर्तव्याला न विसरता मुलांनी आई–वडिलांना व त्यांनी मुलांना समजावून घेण्याची आजच्या पिढीला अत्यंत गरज आहे. मुलांनी मी म्हणजे तसेच केलं पाहिजे व वृद्धाश्रम म्हणजे आई–वडिलांचे सुख असे न समजता त्यांनी केलेल्या कर्तव्याची जाण ठेवावी.


शिवाजी महाराजांसारखा आत्मविश्वास, धाडस, श्रीकृष्णासारखे विचार–चातुर्य, रामासारखे चारित्र्य–नम्रता इ. गुण आजच्या तरुणाकडे पाहिजे. पण एवढे सारे गुण आपल्यामध्ये येतील. कारण तरुणास अशक्य अशी कोणतीच गोष्ट जगात नाही. संस्कार, शिक्षणाची हाती घेऊन पण ती कोवळ्या मनांच्या पेटवू ज्ञान ज्योती.

**प्रा.प्रल्हाद सुरेश शिंदे**
**प्राचार्य,**

# विद्यार्थी का करतात आत्महत्या ?

विद्यार्थी का करतात आत्महत्या?
...... हेच समजत नाही मला
आजचे युग प्रगतीचे, इंटरनेटचे
पण समाजात वावरताना विद्यार्थ्यांवर येते दडपण मग
पास होण्यापेक्षा वाटते नापास होण्याची भिती
आई–वडिलांच्या इच्छा आकांक्षा
उरी वागत जगतो विद्यार्थी
महागडे ट्युशन त्यामुळे जास्तच खर्च
आई–वडिलांची इच्छा पूर्ण होत नाही म्हणून
त्याला दिसतो हा सोपा मार्ग
मग याला पालक दोषी की शिक्षक?
सर्व देतात शिक्षण पद्धतीलाच दोष
मग काय बदल करावं असं वाटतं त्यात
आधी पाश्चात्य देशांत घडत होत्या आत्महत्या
आता तर घडतात त्या महाराष्ट्रात
चित्रपट, दुरदर्शन विद्यार्थ्यांना अगदीच जवळचे
तिकडेच वळतात त्यांची निरागस मने
न्यूज–चॅनल, प्रसार माध्यमे.....
....... का दाखवतात असली कृत्य
त्यामुळेच करतात जास्त विद्यार्थी असे कृत्य
म्हणूनच मला शेवटी म्हणावेसे वाटते की,
बंद कान, बंद डोळे माणुसकी आणि माणुसकीच्या
देशा तुला लाख–लाख शुभेच्छा!

**कु.इनामदार मुस्ताकअली**
**टी.वाय.बी.कॉम**



# तरुणांमधील नैराश्य

आज आपण सगळीकडे पाहतो. पेपरमध्ये वाचतो की, तरुणवर्ग जो आहे तो मोठ्या प्रमाणात नैराश्याच्या छायेत आलेला आहे. सकाळी पेपर वाचायला घेतला की, एक दोन तरी अशा बातम्या असतातच की परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्महत्या, आई वडिल ओरडले म्हणून घर सोडून जाणे वगैरे बातम्यांचे प्रमाण सध्या वाढत आहे. त्याच कारण आहे. मुलांना सर्व आयतं देण्याची सवय लावली आहे आणि किंवा त्यांच्या मध्ये संयम फार कमी झाला आहे. मुलांना सर्वगतिमान व वेगवान लागत असते. त्यांना कोणत्याही गोष्टीसाठी थांबणे गरजेचे वाटत नाही. सगळ कसं गतीमानतेने झाले पाहिजे असं वाटते आणि मनासारखे न झाल्याने ते नैराश्याच्या गर्तेमध्ये सापडतात. बऱ्याचदा स्पर्धा परीक्षांमध्ये तयारी करणारी मुले ही तासनतास अभ्यास करतात. दोन चार वर्षे त्यांचा अभ्यास चालू असतो. मात्र यश न आल्याने ते मानसिक तणावात येताना दिसून येतात.

अशाच एक (विद्यार्थी) मुलगा असतो. ते स्पर्धा परीक्षांचा अभ्यास चार–पाच वर्षे करत असतो. अगदी मनापासून प्रयत्न करुन देखील त्याच्या पदरात यश पडत नसते. सततच्या अपयशाला कंटाळून तो नैराश्याने ग्रासतो. व त्यांच्या डोक्यात विचित्र विचार घोळू लागतो. स्वत:चे जीवन संपवण्याचा विचार त्याच्या डोक्यात येतो. तो घरातून निघतो. जंगलाच्या दिशेने तो जावू लागतो. आपल्या जीवनाला काही अर्थ नाही असे त्याला वाटू लागते. तो रस्त्याने जात असताना एक वृद्ध व्यक्तीचे लक्ष त्या मुलाकडे जाते. त्याला जाणवते की, याच्या मनात गोंधळ उडाला आहे. तो खचलेला आहे. तो वृद्ध व्यक्ती त्या मुलाला विचारतो. काय रे बाळा तू कुठे चालला आहे हे जंगल आहे. पुढे रस्ता नाही. तो मुलगा म्हणाला हो बाबा मला माहित आहे. परंतु मला जंगलातच जायचे आहे. मला स्वत:चे जीवन संपवायचे आहे आणि ते ऐकल्यानंतर मात्र त्या माणसाने त्याला विचारले काय झाले. मला सांग, तू असे काही करु नकोस, तुझे घरी कुटुंब आहे. त्यांचा विचार कर आणि त्याला विश्वासात घेऊन सारे विचारले. त्याने देखील बाबांना सारे सांगितले. बाबांना सारे समजले की हा मुलगा निराश झाला आहे. खचला आहे. ते बाबा म्हणाले हे बघ बाळा मी ह्या जंगलात गेली पंचवीस वर्षे झाले. झाडे लावत आहे. त्यातील ही दोन झाडे बघ. ह्यातले एक झाड खूप जोमाने वाढले. वर्षेभरातच ते बरेच उंच झाले. मात्र त्यातीलच दुसरे झाड मात्र आहे. तसेच आहे त्याची वाढ मात्र खूपच हळू आणि कमी आहे. मात्र जे झाडे जोमाने वाढले आहे. ते बांबूचे झाड आहे. ते वारं किंवा वादळी परिस्थितीत मात्र लगेच उन्मळून पडेल. मात्र हे दुसरे झाड जे वाढले नाही. ते झाडं वडाचेआहे. ते जरी जमिनीच्या वर वाढलेले दिसत नसले तरी ते मात्र जमिनीच्या आत खोलवर मुळं गेली आहेत. त्या मुळ्यांनी जमिनीला घट्ट धरुन ठेवले आहे. त्यामुळे ते आता जेव्हा वाढेल तेव्हा ते पूर्णपणे मजबूत असेल आणि कोणतेही मोठं वाढलं, पाऊस, वारा, झेलणयाची क्षमता त्याला असेल. म्हणून ते झाड हे आतून घट्ट झाले आहे.

त्याचप्रमाणे तुझे आहे. तू निराश झाला आहेस. तू गेली चार पाच वर्षे अभ्यास करत आहेस. तुला जरी कुठे यश आले नसले. तरी तू अगदी यशाचा जवळ आहेस, तुझा अभ्यासाचा पाया आता पक्का झाला आहे आणि आता फक्त तुला त्या वडाच्या झाडाप्रमाणे उचं वाढण्याचीगरज आहे तू तुझी मुळे घट्ट केली आहेस. इतर लोकांप्रमाणे जरी तुला यश नाही आले तरी ते वरवर यशस्वी दिसत आहेत. मात्र तुझे यश हे दिर्घकाळ टिकणारे आहे. तेव्हा तू मागे फिट आणि परत प्रयत्न कर. तू यशस्वी नक्की होशील. बाबांचे विचार ऐकून त्या मुलाला हुरुप येतो आणि तो बाबांचे आभार मानतो आणि परत आपल्या घराकडे येतो.

त्या बाबांप्रमाणे प्रत्येक निराश झालेल्या मुलाला कोणीतरी मार्गदर्शन करणारे भेटतेच असे नाही. मात्र धरी न खचू देता आपली वाट शोधणे गरजेचे आहे आणि सध्या वाटती बेरोजगारी आहेच. त्यापेक्षा पर्याय शोधणे गरजेचे आहे. आपण चांगले शिक्षण घेतले म्हणजे नोकरीच करावी असे नाही ते ज्ञान तुम्ही एखादा व्यवसाय सुरु करण्यासाठी देखील वापरु शकता. मात्र ह्या नैराश्यातून बाहेर पडणे गरजेचे आहे.

**प्रा.ज्योती अहिनवे**
सहाय्यक प्राध्यापिका

# विंचू

विंचवाविषयी आपल्याला काय माहित आहे? विंचू डंक मारुती, इतकच ना? तुमच्या माहितीत एक अजुन भर घालणार आहे. विंचवाची मादी विंचवी म्हणुयात तिला. श्रेष्ठ मातृत्त्व समजायचं असेल तर विंचविला भेटलच पाहिजे.

विंचवी प्रसवते म्हणजे बाळंत होते. तेव्हा सरासरी तिला सहा-सात पिलं होतात. अगदी अंगण्याच्या नखावर मावतील एवढी. काही तासांनी पिलांना भुक लागते. निसर्गाचा कोप झालेल्या जिवापैकी एक म्हणजे विंचवी.

तिला पिलाचं पोषण करण्यासाठी कुठलीच व्यवस्था नाही. विंचवीकडे अशी कुठलीच सोय नाही. आता पिलं जसजशी मोठी होऊ लागतात. तसतशी त्यांची भूक अनावर होऊ लागते. विंचवी बिचारी कासावीस होऊ लागते. पण घ्यायला तर काहीच नाही. पिले तिला चावा घ्यायला सुरुवात करतात तो अंग चोरून निमुट बसुन राहते. आता पिलांची भुक अनावर होते. ते विंचवीचेच लचके तोडायला सुरुवात करतात. पहाता पहाता पिलं पोट भरुन तृप्त झालेली असतात आणि विंचवी.... विंचवी... होती स्वत: पिलांना तृप्त करण्यासाठी समर्पित झालेली असते. याला म्हणतात. आईचं आईपण. 'आई'

मग ती मुंगी, शेळी, माकड, वाघीण, गाय, असो की तुमची माझी माय असो. आईपण तेच बर का

माझ्या युवक मित्रांनो या जगता तुमचा कोणताही अपराध पोटात घालण्याची ताकद फक्त तुमच्या आईबाबांमध्ये आहे. कारण ते कुठल्याही स्वार्था शिवाय तुमच्यावर प्रेम करतात. आपण आपल्या आईबाबांना खूप खूप प्रेम द्या. कारण तीच खरी भक्ती आणि देवपूजा आहे. तुकोबा म्हणतात-

मायबापे केवळ काशी। तेणे न जावे तिर्थाशी

**प्रा.सुभाष घोडे**
राज्यशास्त्र विभाग

# जीवनसार.....

छोडो भी ऐसा तो जीवन में होता है,
जो कभी मिलता है, वह कभी छिनता है।
लेकीन इससे डरकर
संध्या के सिंदुरी प्रकाश में
मंजरीत तुलसी के नीचे दिया
जलाना थोडे ही बंद किया जाता है।
भगवान बात सुनें, न सुनें,
तो भी मंदिर तो मंदिर ही है,
उसमें जो रोज शाम दिया नही जलाता है,
वह तो घर लौटने के अपने ही मार्ग पर
अंधेरा फैलाता है।

**- गाडगे समाधान तुकाराम**
एस.वाय.बी.कॉम

# सवेरा

गरम गरम लड्डू सा सूरज
लिपटा बैठा लाली मे
सुबह सुबह रख आया कौन
इसे आसमान की खाली मे
मुंदी आँख खोली कलियो ने
चिडियों ने गाया गाना
गुन गुन करते भवरो ने
खिलते फुलों को पहचाना
तभी आई फुदक फुदक कर
एक तितलियों की टोली
मधुमखियों ने मधू रस लेकर
भर डाली अपनी झोली
उठो उठो हम लगे काम पर
तब आगे बढ पाएँगे
वे क्या पाएँगे जीवन मे
जो सोते रह जाएँगे

**- भोजने वैभवी**
एफ.वाय.बी.ए.

# जीवन जगण्याची कला

स्वानंदाचा उपभोग घेण्यासाठी निसर्ग देवतेने सुख-दुःख मिश्रित तयार केलेली प्रतिकृती म्हणजे जीवन घटक हा सुखाला आपला मित्र मानून दुःखाला दूर लोटण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु ज्याप्रमाणे टाळी वाजविण्यासाठी दोन हातांची गरज असते, त्याप्रमाणे जीवनाचा अर्थ उमजण्यासाठी सुखाबरोबर दुःखाची आवश्यकता असते.

जीवन ही निसर्गाने दिलेली देणगी असून, त्याचा उपभोग कसा घ्याचा हे मानवाच्या हातात असते. ज्याप्रमाणे निसर्ग देवतेने जीवन दिले. त्याचप्रमाणे त्याचा उपभोग घेण्यासाठी अनेक प्रकारची साधनेही दिली. उदाहरणा द्यायचे झालेतरी तर पैस परंतु हे जीवन जगण्याचे साध्य नसून साधन आहे. याचा विचार मानवाने केव्हाही केलेला नाही आणि मानव याचा विचार आजही करत नाही. हा विचार मानवाने आजही केला असता किंवा केला असता किंवा केला तर थोड्या का होईना प्रमाणात परंतु मानवाच्या सुखात भर पडेल. ज्याच्याकडे जास्त पैसा आहे ती व्यक्ती सर्वात सुखी आहे असे कधीही म्हणता येणार नाही. शेतीवरील शेतमजुरी करणारा शेतमजुर दुःखी आहे हे म्हणनेही चुकीचे आहे. कारण प्रत्येकाच्या वाट्याला काहीशा प्रमाणात का होईना दुःख वाट्याला आलेले असते. फरक एवढाच असतो की, प्रत्येकाचे दुःख हे वेगळे असते.

फक्त धन, दौलत पैसा यातच सुख आहे, हे साफ चुकीचे असून मानवता, माणुसकी, आपुलकी, प्रेम, भावना, आस्था यातच खरे सुख आहे. हे मानवाने समजले पाहिजे. प्रत्येक जन ज्याप्रमाणे कर्म करतो. त्याप्रमाणात निसर्ग देवता सुद्धा सुख-दुःखाची वाटणी करते याबाबत कुणीतरी संताने म्हटले आहे.

पहा कर्म घेई झाले, तेथे कोणाचे न झाले।।
चार पूत्र दशरथाला, अंतकाली तो एकला।।
पहा कृष्णाचे वैभव, बंदीशाळा वासुदेव।।

या अभांगाप्रमाणे आपल्या कर्माचा भोग भोगणे साक्षात परमेश्वरालाही चुकले नाही म्हणजे त्यांच्या जीवनातील सुख-दुःखाचे प्रमाण परमेश्वरालाही बदलता आले नाही तर तुम्ही आम्ही कुणाचे कोण? जीवन जगत असताना फक्त सुखी जीवन जगत आहे. असा मानव आज ही जन्माला आला नाही. परंतु निसर्ग देवतेने प्रत्येकाची निर्मिती करताना सुख मिळविण्याची कला दिली आहे. परंतु तिचा उपभोग करणे आजही मानवाला फारश्या प्रमाणात जमत नाही.

ती कला म्हणजे प्राणीमात्रांवर प्रेमकरा मानवतेला तडा जावू देऊ नका. सर्वांबरोबर मानवता हा धर्म निस्वार्थीपणे निभवा कारण आपण एखाद्या व्यक्तीला अडचणीच्या परिस्थितीत मदत केली तर तो आपणाला काहीतरी दुवा देतो. यातच खरे सुख आहे. मी तर म्हणेन

दुसऱ्याने दिलेला दुवा,
हाच सुखाचा मेवा।
तोच आनंदाने खावा,
आणि तो मिळविण्यासाठी
पुन्हा प्रयत्नवाद रहावा।

आजचा समाज मानवाच्या जीवनाची सार्थकतेची किंमत ज्याच्याकडे असणाऱ्या पैशाच्या प्रमाणावर करतो. परंतु निसर्ग देवता असे न करता त्याच्या जीवनाच्या सार्थकतेची किंमत, त्याचे दुसऱ्यावर असणारे प्रेम दुसऱ्याबद्दल वाटणारी आपुलकी, त्याच्याकडे असणारा मानवता धर्म यावर करत असते. त्यामुळे जीवन जगत दुसऱ्याला कधीही कमी लेखू नये. दुसऱ्याला मदत करता आली नाहीतरी चालेल, परंतु दुसऱ्यावर संकट लादू नका. पैसा हे जीवन जगण्याचे साध्य नसून साधन आहे हे कधीही विसरु नका.

पैशांवर प्रेम नक करता, मानवतेवर प्रेम करा. दुसऱ्याला राग आला तरी चालेल, पण वाईट असे कृत्य करु नका. एखाद्याबद्दल कितीही चिड असली तरी त्याच्या शरीराला हवा तर काटा टोचा. परंतु त्याच्या अंतःकरणाला टोचू नका. हळवे मन कधीही ठेवू नका. ज्याप्रमाणे गीता सांगते तुम्ही येताना काहीही घेऊन आले नाही आणि जाताना काहीही घेऊन जाणार नाही. तुम्ही काही गमवलं तर रडू नका, जे आज तुमचे आहे हे काल दुसरे कोणाचे तरी होते. उद्या दुसऱ्याचे होईल परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. हे कधीही न विसरता दुःखातही सुख मानायला शिका म्हणजे तुम्हाला जीवन जगण्याचे सार्थक वाटेल.

**प्रा.प्रल्हाद सुरेश शिंदे**
**प्राचार्य,** श्री पांडुरंग ज्युनि.कॉलेज
निमगाव सावा, ता.जुन्नर, जि.पुणे

## आठवणीऽऽऽ

एकेकाळी आयुष्याच्या निवांत क्षणी
जुन्या आठवणी दाटल्या मनी।
आठवली एकमेकांवर गायलेली गाणी
तेव्हा म्हंटल होत होशील का माझी राणी।

पण तेव्हा तू माझं प्रेम नाकारलं.
मी पण पुढच्या आयुष्याच स्वप्न साकारलं।
मी तर अजूनही तुला नाही विसरलो
नकळत अनपेक्षित संसार सागरात घसरलो।

जेव्हा जेव्हा विसाव्याला बसायचो
तेव्हा तेव्हा फक्त तुझ्याच आठवणीत असायचो।
कळत नाही कोणाची या नात्याला नजर लागली
अन् तू माझ्याशी अशी क्रूर वागली।

जेव्हा तुझ्या साथीची गरज वाटली
त्या क्षणाला मात्र ती नाही भेटली।
तेव्हा प्रेमाची आसंच तुटली
मी देखील सर्व स्वप्न तशीच पुढं लोटली।

अजूनही असं वाटत तू मला विसरली नसशील
एकदा तरी हृदय हलके करण्यासाठी भेटशील।
जाणवते मला हे आता शक्य नाही
पण कळूनही सर्व काही मी मात्र गप्प राही।

**डुकरे निशा सुरेश**
टी.वाय.बी.कॉम

## रेड्यामुखी वेद

ज्ञानोबाचा स्पर्श होता
तो वेद सांगतो रेडा
अज्ञानी मुका प्राणीही
कसा बोले घडा घडा

अचंबित सकल जन
मग उन्मत झाला रेड
अहम् ब्राम्हास्मी म्हणे
झाला अहंकारी रेडा

विसरुन गेला लायकी
भरला पापाचा घडा
ज्ञानोबाची कृपा संपता
पुनश्च बनला तो रेडा

ज्यांनी घडवलं आम्हा
त्यांचा मान ठेवा थोडा
तेच संपवू शकतात
घे रे आता तरी घडा

**सरजिने निता**
टी.वाय.बी.कॉम

# आई मायेचा सागर....ऽऽ

आई प्रेमाचा सागर, आई प्रेमळ जीवाची शिल्पकार,
छोट्या जीवाची निर्माता, आई भावनांची सरीता,
ममतेची वर्षा आई, हे जग आहे तुझ्याच मुळे आई

अशी ही आई जशी फुललेली जाई, आभाळाची निळाई, विरंजनातील ज्योती, सागरातील गहराई ही आई, आईची महानता, आईची थोरवी जेवढी सांगावी तेवढी कमीच आहे.

आई हा शब्दच किती मार्मिक आहे, आईत काय नाही ममता, मातृत्त्व, प्रेमाचा वर्षाव, जिव्हाळा, त्याग या सर्व गोष्टी फक्त आईत आहे. या सर्व गोष्टींच्या जोरावरच ती सगळ्या जगला, विश्वाला जिंकून घेते, घरच आई म्हणून विश्व आहे. आई नसेल तर सर्व जीवन नीरस आहे. आई नसेल तर मनुष्य पोरका होतो.

मॉ ही मंदिर, माँ ही पुजा।
माँ से बढकर, कोई ना दुजा।।

खरंच आईची तुलना कोणाशीच करता येणार नाही. आई एक देवतेचं मंदिर आहे. ती साक्षात देवता आहे. आपण सवृ लोक मंदिरात जाऊन देवाची पुजा करतो. त्याच्या पाया पडतो. पण बघा जर आपण आपल्या आईची पुजा केली तर खरच सगळ्या देवतांना अभिमान वाटेल की आपल्यापेक्षा हा मनुष्य आपल्या आईला सर्वश्रेष्ठ मानतो. म्हणूनच आपण देवाचीही पुजा केली पाहिजे. पण आईलाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. कारण आई आहे. म्हणून आपण आहोत. या आईमुळेच आपल्याला या विश्वाचे दर्शन घडते.

समईतील ज्योती जशी स्वत:ला जाळून इतरांना प्रकाश देते. तसेच आई आपल्या जीवनाचा त्याग करुन दुसऱ्यांसाइी झगडत असते. अशी आभाळाला मर्यादा नसते. तसेच आईच्या ममतेला मर्यादा नसते.

''स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी''

आईजवळ असताना आपल्याला तिच्या भावना, तिचं मातृत्त्व, तिची ममता कधीच कळत नाही. पण ती जेव्हा आपल्याजवळ नसते. त्यावेळी मात्र आपल्याजवळ सगळं काही असून केवळ आई नसल्यामुळे आपण भिकाजी असतो. ती ज्यावेळी दूर असते. त्यावेळी मात्र तिची आपल्याला महानता कळते.

आई जर नसेल तर जीवनात काहीच अर्थ उरत नाही. कारण आईमुळेच हा जीवनरुपी अमृतवेल सदा फुलत राहीन नाहीतर हा जीवनरुपी अमृतवेल गळून पडेल. कारण आई आपल्या जीवनात आपल्या मार्गात फुलं पसरवित असते. तिचे पदोपदीचे मार्गदर्शन आपल्याला त्यावेळी अनमोल असते. म्हणूनच म्हणतात.


''आईसारखे दैवत साऱ्या जगतामध्ये नाही.''

नऊ महिने ज्या आईने आपल्याला स्वत:च्या उदरात ठेवले, आपल्याला या जगाचे दर्शन घडविले या आईचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

'आ म्हणजे आत्मा, ई म्हणजे ईश्वर' आणि आई म्हणजेचं आत्मारुपी ईश्वर होय.

म्हणूनच मित्रांनो बाई ही चंद्राप्रमाणे शीतल, निर्मळ, सागराप्रमाणे अथांग असे हृदय आईजवळ आहे. आपल्या लेकरांवर प्रेमाचा वर्षाव करणारी आई फार प्रेमळ असते. तिचे आपल्यावर अनंत उपकार असतात. ते उपकार आपण विसरायचे नसतात. त्या उपकारांची परतफेड आपण करायची असते. या आईचे आपल्यावर फार ऋण आहेत. या ऋणातून आपल्याला मुक्त होता येणार नाही. म्हणूनच उतारवयात आपण तिची काठी बनलं पाहिजे. जे-जे तिनं आपल्यासाठी केलं ते-ते आपण तिच्या वृद्धापकाळात केलं पाहिजे. तिची सेवा केली पाहिजे. तरच आपण त्या ऋणातून मुक्त होऊ.

**ढोमे स्वाती नारायण**
टी.वाय.बी.एस्सी.



## ‘जीवन सार’

जन्माला आला आहेस
थोड जगून बघ

जीवनात दु:ख खूप आहे
थोडं सोसून बघ

चिमूटभर दु:खाने कोसळू नकोस
दु:खाचे पहाड चढून बघ

यशाची चव चाखून बघ
अपयश येतं निरखून बघ

डा मांडण सोप असतं
थोड खेळून बघ

घरटे बांधण सोप असंत
थोडी मेहनत करुन बघ

जगणं कठीण मरणं सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ

जीणं मरणं एक कोडं असत
जाता-जाता एवढं सोडवून बघ

**मिस्तरी साहील**
टी.वाय.बी.एस्सी.

## ‘कळ्या व तारे’

फुलणाऱ्या कुंदकळ्यांना
म्हणती लुकलुकते तारे

रात्रीची स्वप्ने फुलती
दिवसाला रखरख उरते

अमृतकिरणांची माला
बरसला झळाळे धरती

लोपले रात्रिचे तारे
लोपला गडद अंधार

हसणाऱ्या फुलत्या स्वप्नी
हा भ्रमरांचा संचार

हे असेच असते सारे
ही अशीच असते सरगम

या रंगीत पंखाखाली
उमलते नव्याने जीवन

**बेल्हेकर ओंकार सोपान**
टी.वाय.बी.ए.

## ‘देवा तुझे किती...’

देवा तुझे किती सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सुर्य देतो

सुंदर चांदण्या सुर्य हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे

सुंदर ही झाडे सुंदर पाखरे
किती गोर बरे गाणे गाते

सुंदर वेलींची सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा तुझी

**प्रा.पावडे नयना विठ्ठल**
सहाय्यक प्राध्यापक

## माय...

हंबरुन वासराले चाटते जव्हा गाय।
तिच्यामंदी दिसते मले तेव्हा माही माय।।धृ।।
फनकाट्या येचायले माय जोय रानी
पायात नसे वहान साधी हिंड अनवायी।
इचू काट्यालेबी तिचा मोजत नव्हता पाय।।१।।
सुट्टीमंदी जव्हा मी येत होतो घरी
उसनं पासनं आणून खाऊ घाले नानापरी
करु नये घाई म्हणे पोटभर खाय।।२।।
बाप माहा रोज लावे मायच्या मागं टुमनं।
बस झालं शिक्शन याचं घेऊ दे होती रुमनं।
शिकूनशानी कुठं मोठा सायेबा होणार हाय।।३।।
माय म्हणे तुम्हाले माया गायाची हाये आन।
भलतं सलतं सांून त्यांचे भरु नका कान
भरुन येत डोयात तिच्या तापी-पूर्णा माय।।४।।
बोलता बोलता एकदा तिच्या डोयात आलं पानी
म्हणे कब्ला दिसनं सांग मले राजा तुही रानी।
या डोयानं पाहन रे मी दुधावरची साय।।५।।
म्हणून वाटे मले तुही भरावं सुखानं ओटी।
पुन्हा एकदा जन्म घ्यावा माय तुझ्या पोटी
अनू ठेवावे माय घट्ट धरुन तुहे पाय।।६।।

**बटवाल निलेश**
एफ.वाय.बी.ए.

## चांगभले.... गोष्ट!

बिरबल एक इनामदार व धर्मप्रीय व्यक्ती होता. तो दररोज कशाचीही अपेक्षा न करता देवाची प्रार्थना करायचा देवाच्या प्रार्थनेमुळे त्याला आत्मीक समाधान व मानसिक बळ मिळत असे. बिरबल नेहमी म्हणायचा की देव जे काही करतो, तो ते मनुष्याच्या भल्यासाठीच असते. कधी कधी आपल्याला असे वाटते की देवाचे आपल्याकडे लक्ष नसावे परंतु असे नसते. कधी कधी देवाच्या आशिर्वादाला लोक शाप समजण्याची चुक करता. तो आपल्याला थोडे कष्ट देतो, कारण आपण येणाऱ्या मोठ्या संकटापासून स्वत:ला वाचवू

**डुकरे शुभांगी शंकर**
एफ.वाय.बी.एस्सी.

## स्वावलंबन!

एक भिकारी था। वह सडक के किनारे बैठ कर भीक माँगता था। एक धनी आदमीको देखकर उसने भीक माँगने के लिए कटोरा बढा दिया।

धनी आदमी ने कहा, 'तुम्हारे पास इतने किमती हाथ है, फिर भी तुम भीख क्यो माँगते हो?' भिकारी बोला, 'सेठजी, मेरे पास धन होता, तो मैं भीख क्यों माँगता?' धनी आदमी ने कहा, 'अच्छा, मै तुम्हें पाँच हजार रुपये देता हूँ। तुम मुझे अपने दोनों हाथ दे दो।' भिकारी बोला, 'मै अपने दोनो हाथ आपको दे दुँगा, तो निकम्मा हो जाऊँगा।' इस पर धनी आदमी ने कहा, 'निकम्मे तो तुम अब भी हो। जो मेहनत की रोटी न खाए वह निकम्मा ही है।'

भिकारी को धनी आदमी की बात लग गई। उसने उसी समय भीख का कटोरा फेंक दिया और कमाकर खाने की कसम खाई। धनी आदमी ने खुश होकर उसे बूट पॉलिश का सारा सामान दिला दिया।

इश्वर ने हमें मेहनत करने के लिए ही ये हाथ दिए है। इनका उपयोग कर हमें स्वावलंबी बनना चाहिए।

**चासकर अश्विनी**
एस.वाय.बी.एस्सी



## बाबा म्हणणारी एक मुलगी असावी...

पोटी एक मुलगी जरुर असावी
थोडी कच्ची थोडी पक्की
पोळी करुन
बाबाला घास भरवण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
रोज संध्याकाळी,
दमलास का रे बाबा आज
असं म्हणण्यास
पोटी एक मुलगी जरुर असावी
लाडे लाडे बाबांवर
लटकेच रुसण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
लगेच राग सोडून,
बाबाला मिठी मारण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
बाबांचे अश्रू हळूच पुसण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
रडू नको ना बाबा
अस म्हणण्यासाठी.
पोटी एक मुलगी जरुर असावी
मुलगी असून आईची माया देण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
शाळेत सोडायला तुच ये असं
बाबांजवळ हट्ट करण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
आईपेक्षा मला बाबा आवडतो,
अस म्हणण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
उमेदीने तिचा मुद्दा
बाबाला पटवून देण्यासाठी

पोटी एक मुलगी जरुर असावी
आई चिडल्यावर
बाबाच्या मागे लपण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
बाबाला कन्यादानाचे सुख देण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
सासुराला जाताना,
बाबांच्या खांद्यावर डोक ठेवून रडण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
पाडवा सणाला, बाबाला भारी साडी

मागण्यासाठी
शेवटी पोटी एक मुलगी जरुर असावी
पोटी एक मुलगी जरुर असावी
बाबांच्या खांद्यावर डोक ठेवून रडण्यासाठी
पोटी एक मुलगी जरुर असावी
पाडवा सणाला, बाबाला भारी साडी
मागण्यासाठी
शेवटी पोटी एक मुलगी जरुर असावी
पोटी एक मुलगी जरुर असावी

**तांबे निकिता शं.**
एफ.वाय.बी.एस्सी

# डोंगरची पाखरं

आम्ही डोंगरराजाची
पोऱ्हं कळसू आईची
आम्ही उघडी बोडकी
बाळं परवरा माईची,
घेऊ हातावं भाकर
वर भाजीला भोकर
खाऊ खडकावं बसून
देऊ खुशीत ढेकर

खेळू टेकडी भवती
पळू वाऱ्याच्या संगती
वर पांघारु आभाळ
लोळू पृथ्वीवरती

आम्ही वाघाच्या लपणाचे
आम्ही वांदार नळीचे
गाव वहाळापल्याड
आम्ही उंबर माळीचे

बसू सूर्याचं रूसून
पहू चंद्राकं हसून
बोलू बाज तिकिड्यांशी
नाचू घोंगडी नेसून
डोई आभाळ पेलीत

चालू शिव्हाच्या चालीत
हिंडू झाडा-कड्यांवरी
बोलू पक्षांच्या बोलीत

आम्ही सस्याच्या वेगानं
जाऊ डोंगर यंगून
हात लाऊन गंगना
येऊ चांदण्या घेऊन

**टाव्हरे अक्षय**
एस.वाय.बी.ए.

# सुविचार

१) हसा खेळा पण शिस्त पाळा.
२) नम्रता हा माणसाचा खरा दागिना आहे.
३) ज्ञान हाच सर्व सामाजिक व राजकीय क्रांतीचा पाया आहे.
४) शिक्षण म्हणजे समाज सुधारणा होय.
५) स्त्री ही क्षणाची पत्नी अनंत काळाची माता आहे.
६) बालमानाची कळी प्रेमाच्या फुंकराने फुलवीत असतात तेचे गुरु.
७) विनय का गुण सर्व सद्गुणांचा अलंकार आहे.
८) पैशांचा संपत्तीचा गैरवापर करु नये.
९) खरे कधी लपत ते कधीतरी उघड होतेच.
१०) जर निश्चय पक्का असेल तर फळ नक्की मिळते.

**नरवडे काजल**
एफ.वाय.बी.ए.

# हास्यजत्रा

१) पक्षप्रमुख: समजत नाही काय करावे? निवडणुका जवळ आल्या की, जो तो उमेदवारीसाठी माझ्या डोक्यावर चढून बसतो.
मित्र: माझं ऐक, डोक्याला तेल चोपडून ठेव. पटापट सर्वजण घसरुन आपटतील.

२) शिक्षक: राजा, यावेळी तू ८० टक्के मार्क्स मिळवायला हवेत बरं का?
राजा: सर मी ८० टक्के नाही तर १०० टक्के मार्क्स मिळवीण.
शिक्षक: माझी चेष्टा करतो का रे ?
राजा: चेष्टा करायला तुम्हीच तर सुरुवात केली, सर.

३) ट्रॅफीक पोलीस: (वेगाने येणाऱ्या स्कूटरवाल्याला) ए.... थांब, थांब तुझ्या स्कूटरला दिवा नाही.
स्कूटरवाला: बाजूला व्हा बाजूला, स्कूटरला ब्रेकपण नाहीत.

४) शिक्षक: पोपट, तू आजही पेन आणला नाहीस.
पोपट: सर, मी विसरलो.
शिक्षक: शाळेत यायचं बर विसरत नाहीस.
पोपट: विसरतो ना... पण आई आठवण करुन देते.

**पोखरकर श्रद्धा**
एस.वाय.बी.ए.

# जसे करावे तसे भरावे...

एक साधू जवळ सोने होते. तो तीर्थयात्रेला जाऊ इच्छित होता. पण सोन्यामुळे तो काळजीत होता. त्याने विचार केला सावकाराजवळ सोने ठेवू, जेव्हा परत आलो की, त्याच्याकडून परत घेता येईल. सावकार धर्मात्मा आहे. चांगला आहे. दानपुण्य सुद्धा करतो. काही दिवस साधू सोने घेऊन सावकारावजळ गेला आणि म्हणाला, 'सावकार मी तीर्थ यात्रेला जाऊ इच्छितो. कृपया करुन माझे सोने आपल्या जवळ ठेवा. आल्यावर घेऊन जाईल.' सावकार म्हणाला, 'ठिक आहे मी सोने ठेवून घेतो.' सोने सावकाराकडे ठेवून साधू निघून गेला. काही काळ गेला. साधू परत आला आणि सावकाराला म्हणाला, 'मला माझे सोने परत करा.' तेव्हा सावकार म्हणाला, 'एक दिवस कपाट उघडे राहिले तेव्हा उंदराने ते सोने खावून टाकले. आता मी कोठून देऊ?' साधू गुपचूप निघून गेला. काही दिवस गेले. सावकारचा मुलगा बेपत्ता झाला. खूप प्रयत्न केले पण मुलगा मिळाला नाही. सावकार खूप दु:खी होता. साधू आला आणि म्हणाला. 'सावकार तुझ्या मुलाला घार उचलून घेऊन गेली.' यावर साधू म्हणाला, जसे उंदिर खावू शकतात, तसे घार ही मुलगा उचलू शकते. सावकाराला आपली चूक कळते. तो म्हणाला, मी तुझे सोने परत करतो, तू माझा मुलगा परत कर. कधी कधी जशाच तसे भेटतात.

नीतीकार म्हणतो, कधी छोट्या माणासाला रागाच्या भरात बोलू नका. कधी-कधी सामन्य माणूस ही सूड घेऊ शकतो. कोणा एका जवळ खोटे चार आणे होते. गाडी चालू असतानाच त्याने वृत्तपत्र विकत घैतले आणि खोटे चार आणे दिले. तो खूश झाला. खोटे पैसे देऊन वृत्तपत्र विकत घेतले. पण त्याने जेव्हा वृत्तपत्र पाहिले तर ते जुने होते. अशाप्रकारे अनेक घटना होत असतात. याकरता काही उलट सुलटे करताना शंभर वेळा विचार करावा.

दान करायचे असल्यास जास्त विचार करु नये. कोणाला फसवायचे असल्यास शंभर वेळा विचार करा आणि विचार करा की, आज बदललेले मन कदाचित उद्या बदलेल. कोणता चांगला विचार आला की तो लक्षात ठेवा. फसवून मिळालेला पैसा आमच्या खात्यात जमा होईल. त्या पैशाचा उपयोग सर्व परिवार करतो. सर्व खोटे काम तुमच्या नावावर होतात. जुगार जिंकला तर सर्व भागीदार होतात. पण हारुन आला तर लोक वाईट म्हणतील उपदेश करतील ह्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे.

**डुकरे साक्षी सुनिल**
एफ.वाय.बी.ए.

# पाणी

शब्द जाऊ दे, अर्थ राहू दे, विषय आहे गाण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा।।धृ।।

मोती बनुनी सरसर येती, वर्षेमधल्या सरीतुनी
माळ ओवते, निसटू जाते, बावरते जणू परी कुणी
या मोत्यांचा संचय कर तू, प्रश्न तुझ्या रे जांण्याचा
आभाळातील बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा।।१।।

आभाळातिल ह्या मोत्याने, मातीमधूनी पिकती मोती
निसर्ग जाणी मोल तयाचे, तुम्ही मानसे का मग कोती?
संचय करता तिजोरीतल्या, खणखणत्या त्या नाण्यांचा
आभाळातील बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा।।२।।

कशास ऐसा वेडाचाळा, स्वत: होऊनी ठगण्याचा
दृष्टीकोन तू बदल आता रे, निसर्गास ह्या बसण्याचा
तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा?
आभाळातील बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा।।३।।

**घोडे कल्याणी किसन**
एस.वाय.बी.कॉम.

# सुविचार

१) तुम्ही किती जगलात ह्यापेक्षा कसं जगलात याला जास्त महत्त्व आहे.
२) चांगला माणूस घडवणे हेच शिक्षणाचे खरे ध्येय आहे.
३) जो चांगल्या वृक्षांचा आधार घेतो त्याला चांगली सावली लाभते.
४) संकट टाळणं माणसाच्या हाती नसतं पण संकटात सामना करणं त्याच्या हातात असते.
५) ज्ञानाला अर्थ कृतीमुळे प्राप्त होतो. कृती नाही तर ज्ञानाला अर्थ नाही.
६) वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन होय.
७) एकमेकांची प्रगती साधते ती खरी मैत्री.
८) रागाला जिंकण्याचा एकमेव उपाय– मौन
९) सत्याने मिळते तेच टिकते
१०) ऐकावे जनाचे करावे मनाचे

**पटेल आलिया**
एस.वाय.बी.कॉम.

# पाहिजे

जन्म द्यायला आईच पाहिजे
राखी बांधायला बहिण पाहिजे
गोष्टी सांगायला आजी पाहिजे
हट्ट पुरवायला मावशी पाहिजे
पुरणपोळी भरवायला मामी पाहिजे
जीवनाच्या सोबतीला मैत्रिण पाहिजे
आयुष्याच्या साथीला बायको पाहिजे
पण हे सर्व करायला आधी
एक मुलगी जगली पाहिजे...

**डुकरे पुजा बा.**
एफ.वाय.बी.ए.

# प्रेम....ऽऽ

प्रेम कधी झालच नाही हो.......
बरं झालं..... पण ते प्रेम आणि ज्या व्यक्तीवर
प्रेम केलं ती व्यक्तीही मिळाली नाही.

सगळे बोलायचे खरं प्रेम कधी सोडून जात नाही. पण मी सुद्धा खरं प्रेम केलेलं काय माहित का सोडून गेलं. बर गेलं ते गेलं पण मागे सगळे रुसवे, फुगवे, आनंदी क्षण फक्त आठवणी म्हणूनच ठेवून गेलं. जेव्हा मी बोलायला लागले खरचं यार........ प्रेम नाही टिकत शेवटपर्यंत! तेव्हा बाकीचे बोलायला लागले, तू ज्या व्यक्तीवर प्रेम केलं ती व्यक्ती चुकीची निघाली. पण मला कधीच वाटलं नाही की ती व्यक्ती चुकीची निघाली....... कारण मी तर खर प्रेम केलंल ना........ म्हणतात ना, 'प्रेमात लोक आंधळे होतात'......... तसचं काहीसं, पण मी तर एवढी आंधळी झाले की, ते प्रेम, ती व्यक्ती माझ्यापासून खूप दूर जाऊन ही, आठवणी मनात ठेवूनच जगत राहिले. 'कळ्या उमलल्या त्याच फुल झालं. आणि कधी सुकून गेलं समजलं नाही. आणि तेव्हा मला प्रेम म्हणजे काय असत ते समजलं.'

**डुकरे पुजा बा.**
एफ.वाय.बी.ए.



## रानवारा

कसे देवाचे आकाश त्याचे कोरडेच डोळे
जीव किती हे जळावे माझ्या धरतीचे भोळे
मायमातीची लेकरं त्यांना आसवांची वाट
वाट पाहता पाहता होई रात्रीची पहाट
पहाटेच्या प्रहराला स्वप्न अंकुराचे जळे
माझा भुईचा दुष्मान दुष्ट दुष्काळ सारखा
आटलेला हा पाऊस ढगा जगाला पारखा
माणसाच्या प्राक्तनाशी नित्य निसर्ग का खेळे
झुंज वावराच्यासाठी झुंज माळरानासाठी
देता देता वाहतील झरे गर्भातले पाठी
उदास हे वाळलेले पुन्हा बहरतील मळे

**पटेल आलीया सलीम**
एस.वाय.बी.कॉम.

## दवबिंदू

दवांत आलिस भल्या पहाटी
शुडाच्या तोऱ्यांत एकदा,
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरलं पावलांमधी शोभा
अडलिस आणिक पुढे जराशी
पुढे जराशी हललिस,
मागे वळुनी पाहणे विसरली का?
विसरलीस का हिरवे धागे?
लक्ष्य कुठे अन कुठे पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा,
डोळ्यांमधल्या डाळींबाचा
साग धरावा कैसा पारा
अनोळख्याने ओळख कैश
गतजन्मींची द्यावी सांग,
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजाची रांग
तळहाताच्या नाजुक रेषा
कुणी वाचाव्या, कुणी पुसाव्या,
तांबूस निर्मल नखांवरती अन्
शुभ्र चांदण्या कुणी गोंदाव्या

# कविता

दवांत आलिस भल्या पहाटी
शुक्राच्या तोऱ्यांत एकदा,
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरलं पावलांमधी शोभा

अडलिस आणिक पुढे जराशी
पुढे जराशी हललिस,

मागे वळुनी पाहणे विसरली का?
विसरलीस का हिरवे धागे?

लक्ष्य कुठे अन कुठे पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा,

डोळ्यांमधल्या डाळींबाचा
साग धरावा कैसा पारा

अनोळख्याने ओळख कैश
गतजन्मींची द्यावी सांग,

कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजाची रांग

तळहाताच्या नाजुक रेषा
कुणी वाचाव्या, कुणी पुसाव्या,

तांबूस निर्मल नखांवरती अन्
शुभ्र चांदण्या कुणी गोंदाव्या

**भोजणे वैभवी चंद्रशेखर**
एफ.वाय.बी.ए.

# कष्टाची भाकरी

पीठ कांडते राक्षसी
तसे कडाडते ऊन
प्राणसई घनावळ
कुठे राहिली गुंतुन?

दिला पाखरांच्या हाती
माझा सांगावा धाडून
येग येग घनावळी
मैत्रपणा आठवून......

पडवळा–भोपळ्यांची
आळीं ठेविली भाजून,
हुआ मोडून घरातं
शेणी ठेविल्या रचून,

बैल झाले ठाणबंदी,
झाले मालक बैचेन,
तोंडे कीमेली बाळांची
झळा उन्हाच्या लागून,

विहिरीच्या तळी खोल
दिसू लागले ग भिंग
मन लागेना घरात
कशी येशील तू सांग

ये ग दौउत धावत
आधी माझ्या शेतावर
शेला हिरवा पांघर
मालकांच्या स्वप्नांवर,

तशी झुलत झुलत
ये गं माझिया घराशी
भाचे तुझे झोंबतील
तुझ्या जरींच्या घोळाशी

# कविता

जिसने सूरज चाँद बनाया,
जिसने तारों को चमकाया,

जिसने फुलों को महकाया,
जिसने चिड़ियों को चहकाया,

जिसने सारा जगत रचाया,
जिसने गढी हमारी काया,

हम उस ईश्वर के गुण गाएँ,
सदा प्रेम से शीश झुकाएँ।।

खुबसुरत होत है वो पल,
जब पलको में सपने होते है
चाहे जितने भी दूर रहे,
अपने तो अपने होते है।।

# जीवनाची ओळख!

आपुले जगणे..... आपली ओळख! उपरे, अर्धे जोडू नको
दिवा होऊनि उजळ जगाला.... चाळू होऊन कापू नको!

नित्य घडावे वाचन, लेखन.... क्षण कार्याविण दवडू नको
नित्य परवचा, व्यायामाविण झोप घ्यावया पडू नको!

पावित्र्याची पांघर वस्त्रे, होऊन पटकूर पसरू नको
शोभेहुनही श्रेष्ठ स्वच्छता, आदिमंत्र हा विसरु नको!

नम्र रहावे, सौम्य पहावे, उगा कुणास्तव अढी नको
उगा कुणाला खिजवायला करु तयावर कडी नको!

नको फुकाची हांजी हांजी.... लोचट, बुळचट काही नको
परंतु दिसता उदात्त काही, ताठर माथा मुळी नको!

पेल शक्तीने गोवर्धन तू, कंस होऊनी छळू नको
नको उगाचच वाद परंतु कुणि धमकवता पळू नको!

अपुल्या अपुल्या दु:खासाठी नयनी अश्रू ठेवू नको
पण दुसऱ्यास्तव वाहो करुणा, व्यर्थ कोरडा राहू नको!

तुडवित राने खुशाल जावे, नव्या पथाला भिऊ नको
ज्यावर श्रद्धा प्राणाआतून ते केल्याविण राहू नको!

जेथे वाटा तेथे काटा, उगा भेदरुन अडू नको
करता हिंमत, जगात किंमत! भेकड, गुळमुळ रडू नको!

कर्तृत्त्वाचे घडवी वेरुळ, कर्तव्याला मुकू नको
मातेसह मातिचे देणे फेडायला चुकू नको!

**– प्रा.शितल कांबळे**

# बळीराजा

विराट सतरा करोडात गेला
धोनी पंधरा करोडात गेला.
जगाचा पोशिंदा मात्र
झाडावर लटकून मेला
भारत कृषीप्रधान की क्रिकेटप्रधान
हाच मोठा प्रश्न पडतो
शेतकरी जगला काय मेला काय
सांगा कुणाला फरक पडतो
अरे एखादी मॅच तुम्ही
वावरात घेऊन पहा
शेतकऱ्यांची जिंदगी
एकतरी दिवस जगून पहा.
खेळांडूसारखे करोड नको
फक्त पिकमालाला भाव द्या
कृषीरत्न, कृषीभूषण नको
फक्त शेतकऱ्याला मान द्या.....

**बनकर श्रद्धा चंद्रकांत**
टी.वाय.बी.कॉम

# भ्रमणध्वनी

मोबाईल नक्की काय असत?
विचाराची देवाण घेवाण करण्याचं माध्यम असतं.
मोबाईल नक्की काय असतं.
मोठ्यांच ते खेळणं असतं
लहानांचे स्वप्नं असतं
मोबाईल नक्की काय असतं
सिनेमा पाहणाऱ्यांचा टि.व्ही असतो.
गाणं ऐकणाऱ्यांसाठी रेडिओ असतो
मोबाईल नक्की काय असतं
संदेश पाठवणाऱ्यांचं ई–मेल असतं.
रिंगटोन वाजवणाऱ्यांच पियानो असतं
मोबाईल नक्की काय असतं
फोटो काढणाऱ्यांचा कॅमेरा असतं
वेळ पाहणाऱ्यांच घड्याळ असतं.
मोबाईल नक्की काय असतं.
खेळ खेळणाऱ्यांचं जॉईस्टिक असतं
प्रेमी युगलांचे तासन्तास गप्पा
मारण्याचे साधन असतं.

**पोखरकर पौर्णिमा सुभाष**
टी.वाय.बी.एस्सी

# बापाचा महिमा

आईचं गुणगान खूप झाले.
पण बिचाऱ्या बापाने काय केले
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी,
आपण फक्त गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रूंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट,
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई,
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही.
देवकी–यशोदेचं प्रेम मनात साठवा.
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेवही आठवा.
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत,
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ
काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी
आपण मात्र वापरी शर्ट–पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न,
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागते धाप,
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप
जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा
त्यांनी समजून घ्यावं हीच माफक इच्छा.

**पादीर दिव्या बाळू**
टी.वाय.बी.ए.

## चिडीया

सुरज निकला चिडीयाँ बोली
कलियोने भि आँखे खोली।
आसमान मे छाई लाली,
हवा वही सुख देनेवाली।
नन्ही नन्ही किरणें आई,
फुल हँसे कलियाँ मुस्काई।

**गाडगे संचिता कैलास**
टी.वाय.बी.कॉम.

## आयुष्याचा प्रवास

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस विसरत नाही
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकांस दोष देऊन
नित्य चालू वादविवाद
धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही
ह्दयाचे पाऊल कधी,
ह्दयाकडे वळत नाही
इतकं जगून झालं पण,
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही
क्षण एक येईल असा,
घेऊन जाईल हा श्वास,
अध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या.
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या.

**बोऱ्हाडे अनिकेत संतोष**
टी.वाय.बी.ए.



## प्रमुख व्यक्तिंयो के समाधि स्थळ तथा स्थान

| नाम | समाधि स्थळ | स्थान |
| --- | --- | --- |
| महात्मा गांधी | राजघाट | नवी दिल्ली |
| जवाहरलाल नेहरु | शांतीवन | नवी दिल्ली |
| लाल बहादूर शास्त्री | विजय घाट | नई दिल्ली |
| इंदिरा गांधी | शक्तीस्थल | नई दिल्ली |
| मोरारी देसाई | अभय घाट | अहमदाबाद |
| चौधरी चरण सिंह | किसान घाट | नई दिल्ली |
| शंकर दयाल शर्मा | कर्म भूमी | नई दिल्ली |
| राजीव गांधी | वीर भूमी | नई दिल्ली |
| जगजीवन राम | समता स्थळ | नई दिल्ली |
| गुलजारी लाल नंदा | नारायण घाट | अहमदाबाद |
| डॉ.राजेंद्र प्रसाद | महाप्रयाण घाट | पटणा |
| भीमराव आंबेडकर | चैत्रा भूमी | दादर |
| के.आर.नारायण | उदयभूमी | नई दिल्ली |
| ज्ञानी जैल सिंह | एकता स्थल | नई दिल्ली |
| संजय गांधी | शांतीवन | नई दिल्ली |

## आयुष्य जगताना...!

अंहकार हा काटकोनासारखा नेहमी
ताठपणे उभा राहणारा.

दु:ख हे विशालकोनासारखे नेहमी
आकाशाकडे बघणारे

नम्रताही लघुकोनासारखी
साऱ्यांचा आदर करणारी

आयुष्य हे त्रिकोणासारखे
तीन अवस्था दर्शविणारे

## वाचन संस्कृती

वाचनास खुल्या ह्या दाही दिशा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा
तुम्ही वाचा गाणी, गोष्टी किती
आणि वाचून आणा ही शिवनीती
वाचनाने जपुया आपली संस्कृती
प्रेरणा घेऊनी चालवा वारसा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा

वाचा दैनिक, मासिक, विनोदी कथा
आणि नाजूक, हळव्या आत्मकथा
आसवे दोन ढाळा वाचूनी व्यथा
वाचुनी ज्ञान मिळणं पसा पसा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा

जागवा चेतना वाची कारगील
चेतवा वाचनास प्रत्येक मुल
वाचूनी पेटवा अर्धी विझलेली चुल
वाचुनी बनावे ज्ञानरुपी कवडसा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा

कधी वाचा अंगाई
कधी वाचा हो आई
कधी वाचा संतांची पुण्याई
वाचुनी सारे अमटुया ठसा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा

वाचा कुराण, बायबल आणि गिता
वाचा ऐक्य समता नि बंधुता
वाचुनी नांदवुया समानता
पुस्तके नीतीमूल्यांचा आरसा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा

करुनी संकल्प वाचन प्रेरणादिनी
जरी वाचन व्हाटस्अप, हाईकवरुनी
वाचुनी मिळवुया ज्ञान संजीवनी
कलमांना मुजरा सरलाला आसरा
वाचनाचा मनाशी घ्यावा वसा

**सोनवणे माया रोहिदास**
एफ.वाय.बी.एस्सी.



# वाचाल तर वाचाल!

वाचाल तर वाचाल
जगला जिंकाल

वाचनाने मिळले ज्ञान
वाचनाने वाढेल ज्ञान

गवसेल जगण्याचा मार्ग
अनुभवाला पृथ्वीवर स्वर्ग

कुविचारावर कराल मात
सुविचारांची धराल साथ

न्यूनगंडावर मिळवाल विजय
नीतीमत्तेने होईल विजय

वाचन करील नैराश्य दूर
जीवनाला मिळेल सुंदर सूद

वाचनच आहे सखा सोबती
वाचनाने होईल सर्वांची प्रगती

वाचाल तर वाचाल
सर्वकाही मिळवाल.

**-प्रा.आशिष सोपान गाडगे**

# आई-कथा

लहान असल्यापासून आई मुलांना सांगत असते. इथे जाऊ नकोस बाबा मारेल, तिथे जाऊ नको बाबा मारेल, झाडावर चढू नको बाबा मारेल, नदीवर जाऊ नको बाबा मारेल, शाळेत जा नाही तर बाबा मारेल हे करु नको नाहीतर बाबा मारेल. ते करु नको नाहीतर बाबा मारेल, मग मुलसुद्धा बाबांना घाबरतात. बाबांच्या भयाने शाळेत जातात. बाबांनी मारु नये म्हणून अभ्यास करतात. बाबांच्या दहशती खाली शिकत असतात. हळूहळू मुले बाबांकडे दुर्लक्ष करुन आईवरचं प्रेम करु लागतात. मनामधून बाबांना काढून टाकतात आणि आईच्या चरणांवरती सर्वस्व अर्पण करतात. बाबांपासून चार हात लांबच राहतात.

मुलं आईचं गाणं गातात, मुल आईवर कविता करतात, कोणतच मुल बाबाला दुधावरची साय म्हणत नाही. लंगड्याचा पाय म्हणत नाही, वासराची गाय म्हणत नाही. बाबांसाठी मुलांकडे शब्दच नाही. मुलाच्या पायाला ठेच लागली तरी मुले बाप रे! म्हणत नाही आणि साने गुरुजींनीही 'श्यामचा बाप' दिसत नाही. आई घरात असली की, कस घर भरल्यासारखं वाटतं. बाबा घरात असले की मात्र स्मशान शांतता, मुल शपथसुद्धा आईचीच घेतात. बाबा शपथेच्याही लायकेचा नसतो. बाबा असतो केवळ मुलांच्या नावाच्या आणि आडनावाच्यामध्ये नावापुरता. मुला विठोबाला माऊली म्हणतात. धरणीला माय म्हणतात आणि देशाला माता म्हणतात. बाबा मात्र धरणीतून, देशातून आणि मुलांच्या मनातून केव्हाच झालेला असतो हद्दपार.

बाबा असतो कठोर, काळीज नसलेला निर्दयी, मारकुटा, बाबा असतो मुलांच्या स्वप्नात आलेला बागलबुवा. बाबा म्हणजे केवळ रुपये पैसे कमवण्याचं यंत्र. तेवढ काम त्याने तकेले की, त्याच कर्तृत्त्व संपन्न, पण मग अस असूनही बाबा मेल्यावर मुलांच्या छातीत धडकी का भरते. का ओघोळतो मुलांच्या डोळ्यातून पाऊस, का वाटत मुलांना पायाखालची जमिन सरकल्यासारखं, का वाटतं मुलांना आपण बेसाहारा झालो म्हणून, का हंबरतात बाबा गेल्यावर मुलं, का मुलं घाबरतात बाबा गेल्यावर. कथा, कादंबऱ्यात कधीही नसलेला हा बाबा प्रत्यक्षात जेव्हा

# बाबा.....ऽऽ

असा का रे बाबा तू
कितीही थकलास तरी
का नाही रे चिडत तू

तू तुझ्या भावना
कधीच व्यक्त करत नाहीत
तुझं माझ्यावरचं प्रेम

कधीच बोलून दाखवत नाहीस
तुझा कुठलाही त्रास
एक लेकच समजू शकते

तु कितीही नाही बोललास
तरी तुझ मन मीच वाचू शकते.
तुझी शिकवण

आजही मला आठवते
तुझ्या सोबत घालवलेला प्रत्येक क्षण
मी रोजच जगत असते

रोज येते रे बाबा
तुझी आठवण मला
तुझी लेक आता मोठी झाली
हे कळलय ना रे तुला

बाबाची लाडकी लेक.......

**घोलप वैष्णवी तानाजी**
एफ.वाय.बी.एस्सी.

## बापाचे प्रेम....

जन्माला येताना आई,
मोठे होताना आई,
ठेच लागल्यावर आई,
दु:ख झाल्यावर आई
अरे बापाला कधीतरी विचारत जा
त्याचही स्वप्न समजून घ्या......

जन्माला येते वेळी गावात पेढे-बर्फी वाटतो तो बाप असतो. मोठे होताना स्वत: फाटके कपडे घालून आपल्याला प्रत्येक सणाला नवीन ड्रेस घेतो तो बाप असतो. ठेच लागल्यावर औषध नसल्यावर, खिशात पैसे नसताना औषध घेऊन येतो तो बाप असतो. आपल्याला दु:ख झाल्यावर हळूच येऊन समजूत घालतो तो बाप असतो. बाप म्हणजे दिसून न दिसणारा. मनात हसणारा देव असतो. आईला जे करता येत नाही. ते आपला बाप करत असतो. आपल्या सुखासाठी दुसऱ्याच्या शेतात दिवसरात्र मरत असतो. बाबा, डॅडी, पप्पा म्हणण्यासाठी तो स्वत: हवा असतो. तो नसल्यावर प्रत्येक दिवा मालवल्यासरखा दिसत असतो. आपण मोठे झाल्यावर त्याला ज्ञान शिकवतो, पण ज्ञानाच्या प्रकाशाचा दिवा तोच आपल्याला दाखवतो. रडवणारा बाप म्हणजे दोन अक्षरांचे माप असते.

तो असल्यावर कोणाची बोलायची टाप नसते. आई नसल्यावर तो दोघांचे कर्तृत्त्व निभावतो. आयुष्याच्या प्रत्येक क्षणी सुखासाठी सरसावतो. कामावरुन येताना खाऊचा पुडा आणतो. माझी मुले हुशार आहेत, गावाला अभिमानाने सांगतो. तो आपल्यासाठी खूप करतो, पण आपण त्याच्यासाठी काय करतो? का आपल्याला आईच आठवते? आईवरच सगळे कविता करतात.

बापावर कविता करता येत नाही. पण ज्याला बापावर कविता करता येत नाही, त्याला मी माणूसच म्हणणार नाही. बाप कुणा कळलाय का? याची कधी शंका वाटते, पण त्याच बापाची माया मला माझ्या चुलत्यांत भेटते.

**गलांडे साक्षी शिवाजी**
एफ.वाय.बी.एस्सी.

## सद्‌रक्षणाय खलनिग्र:णाय

लोक जरी कायदा मोडत असले तरी त्यांना कायदा पाळणारे पोलीस आवडतात. अधिकारी चांगला, प्रामाणिक, शिस्तप्रिय, न्यायी व माणुसकीचा जाण असलेला असेल, तर डोक्यावर घेतात. भले मग तो राजकीय पुढाऱ्यांना व वरिष्ठांना आवडो वा ना आवडो. सरकारचे दृश्य हात म्हणजे पोलीसच. सरकार किती न्याय करते. त्याचा तापमापक म्हणजे पोलीसच. माणसे अडचणीत आलेशिवाय पोलीस ठाणेवर जात नाहीत. केवढी मोठी संधी असते. लोकांचे प्रेम मिळवायला, त्यांचा आभार संपादन रकायला? कुणाची जोरी काढून दे, कुणाला गुंडांच्या दहशतीतून सोडवं, कुणाच्या मुलीला पुन्हा नांदविण्यासाठी मदत कर, कुणाला घर परत मिळवून दे, कुणाला दारु पासून सोडवं. परमेश्वरानंतर इतके उत्कृष्ठ काम करण्याची संधी फक्त पोलीस खात्यातच मिळते. हजार हजा असावेसे वाटतात. जो जगन्नीयता अदृश्य शक्तीने जग चालवितो, इथे प्रत्यक्ष काम करता येते.

अशी ही आमची ग्रेट सर्व्हिस.. राजकारण्यांनी, बाहुबलींनी आणि काही भ्रष्ट अधिकारी यांनी तिची अब्रु वेशीला टांगली. विश्वास बसणार नाही तुमचा, तरी सांगतो खूप चांगली माणसं आहेत. दिवस बदलणारच, गाडी परत रुळावर येईलच, कायद्याने चालणाऱ्या व माणुसकीने वागणाऱ्या पोलीसाला टोपी, चमड्याचा पट्टा व बुटासह स्वर्गात प्रवेश दिला जाईल. देवदूतही त्याच स्वागत करतील. पुढचा जन्म असलाच तर परमेश्वराकडे एक मागणं आहे. देवा मला परत पोलीसचं कर! पण हाता डंडा जरा मोठा दे!



# सुविचार

१) ज्ञान मिळवण्याची उत्कृष्ट पद्धत म्हणजे एकाग्रता.
२) आजचे वाद हे उद्याचे विनोद ठरतात.
३) सरावाने माणूस परिपूर्ण होतो.
४) तडाखे सहन करणाराच ताठ उभा राहू शकतो.– कार्व्हर
५) माहिती ही पुस्तकात असते आणि ज्ञान हे जीवनात शोधायचे असते.
६) एकाची तत्त्वे ती दुसऱ्याला थेरी वाटते.
७) पाणी, वाणी आणि नाणी व्यर्थ शिणवू नये.
८) दुसरेकी जय करनेसे पेहले खुद की जय करले।
९) सोचो सोचकर बताओ कौन क्या साथ लेके जाएगा।
10) More the ego less the knowledge & less the knowledge more the ego.
11) Life is an opportunity cash it.
12) Life is a song, sing it.
13) Life is a promise meet it.
14) Life is a duty, fulfill it.

**जगदाळे अस्मिता शांताराम**
टी.वाय.बी.एस्सी.

# जीवन......

दुसऱ्यासाठी जगायच असतं.
त्यातच खर जगणं असत
जीवन असते एक फुल
पाकळ्यांसारख झिजायचं असतं

जीवन असते एकदा
दुसऱ्याचा विचार करायचा सदा
दुसऱ्याच मन दुखवायचं नसतं
स्वत:च दु:ख सहायच असतं.

जीवन असते अनमोल
दुनिया असते स्वार्थी

# 'भारत'

दुनियेच्या या भवसागरात
भारत माझा देश महान
उसळत्या या लाटांत
तिरंगा माझा जीव की प्राण

भारत माता माझी महान
सुजलाम–सुफलाम या भूमीत
भागते पिकांची तहान
सृष्टीरुपी या वृक्षांत
भारतमाता आहे सौंदर्यवान

# माणसाची ओळख...

माणूस जेव्हा जन्माला येतो
तेव्हा त्याला नाव नसतं...
पण श्वास असतो........
ज्यावेळी तो मरतो,
तेव्हा फक्त नाव असतं
पण श्वास नसतो......
नाव आणि श्वास यांच्यामधील
अंतर म्हणजे आयुष्य असतं.....
भरलेला खिसा माणसाला
दुनिया दाखवतो. अन्.......
रिकामा खिसा याच दुनियेतील
माणसं दाखवतो....

# मैत्री

माणुसकीच्या गावात जाणारी पायवाट.....
भिजुन चिंबकरणारी समुद्राची लाट....
वादळात दिव्याभोवती पसरणारे हात.....
संकटकाळात खांद्यावर हात ठेवणारी अलगद साथ..

तुम्ही काही लोकांना सर्व काळ फसवू शकाल आणि सर्व लोकांना काही काळ फसवु शकाल. परंतु सर्व लोकांना सर्व काळ फसवू शकत नाहीत.

कौन किसी को सजा देता है।
दोस्त बनकर भी धोका देता है।
एक माँ का दिल है इस दुनिया में...
वरना कौन मुफ्त मे दुवा देता है।

एकदा इतका मोठा पाऊस पडावा,
की सगळा इगो वाहून जावा.....
एकदा इतकं कडक ऊन पडाव,
की जवळच्या सावल्यांच महत्त्व कळावं....
एकदा इतकी थंडी पडावी.
की सगळी दु:ख गोठून जावी......

विश्वास एक छोटा शब्द आहे...
तो वाचायला एक सेकंद लागतो....
विचार केला तर मिनिटं लागतो....
समजलं तर दिवस लागतो....
पण सिद्ध करायचं म्हटलं
तर संपूर्ण आयुष्य लागतं.....

* स्वत:च्या बाबतीत स्वत: कधीच न्यायाधीश बनू नका.
* आवाजावरुन नम्रता, उच्चारावरुन विद्वत्ता व वर्तनावरुन शील समजते.
* कलेशिवाय जीवन म्हणजे सुगंधाशिवाय फुल आणि प्राणाशिवाय शरीर!

मैत्रीत नसे कसली रिती,
मैत्री म्हणजे निखळ प्रीती....
मैत्रीत दाटतो एकच भावा,
मैत्री म्हणजे एकमेकांच्या काळजाचा अचूक ठाव

मैत्रीत असे फक्त प्रेमाचीच शिंपण
खरंतर, मैत्री म्हणजे दोन जिवांची नाजूक गुंफण

मैत्रीच्या प्रकाशाने क्षितीजाला गाठले....
मिठित तुला घेऊनि त्यास हायसे वाटले...

सुर्यालाही तुझे कोवळे मनापासून भावले...
भेट घेण्या मित्रा तुझी तारे सुद्धा धावले...

**बोंबे सौरभ तुळशिराम**
एफ.वाय.बी.ए.

# दोस्त यारी दुनियादारी

किसिका पेट निकल आया है,
किसिके बाल पकने लगे है
सब पर भारी जिम्मेदारी है,
सबको छोटी मोटी कोई बिमारी है
दिनभर जो भागते दौडते थे,
वो अब चलत चलते भी रुकने लगे है
पर ये हकीकत है
सब दोस्त थकने लगे है...
किसी को लोन की फिक्र है,
कही हेल्थ टेस्ट का जिक्र है
फुर्सत की सब को कमी है,
आँखो मे अजीब सी नमी है
कल जो प्यार के खत मिलने लिखते थे,
आज बीमे के फार्म भरने में लगे है
पर ये हकीकत है
सब दोस्त थकने लगे है.....

**जगदाळे अस्मिता शांताराम**
टी.वाय.बी.एस्सी.

# गीत

गोमु माहेरला जाते हो नाखवा।
तिच्या घोवाला कोकण दाखवा।।
दावा कोकणची निळी निळी साडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा फुलांचा ताटवा।।१।।

कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची मांडाची जवळून मापवा।।२।।

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा ।।३।।
गोमू माहेरला जाते हो नाखवा।
तिच्या घोवाला कोकण दाखवा।।

**पोखरकर सिद्धांत रविंद्र**
एफ.वाय.बी.ए.



# गीत

नानी वाली कथा कहानी,
अब भी जग मे लगे सुहानी।
बेटी युग के नए दौर की,
आओ लिख ले नई कहानी।

बेटा युग मे बेटा-बेटी,
सभी पढेंगे, सभी बढेंगे।
फौलादी ले नेक इरादे,
खुद अपना इतिहास गढेंगे।

देश पढेगा, देश बढेगा,
दौडेगी अब तरुण जवानी।
नानी वाली कथा कहानी,
अब भी जग में लगे सुहानी।

बेटा शिक्षित आधी शिक्षा,
दोनो शिक्षित पुरी शिक्षा।
हमने सोचा, मनन करो तुम,
सोचा-समझो करो समीक्षा।

सारा जग शिक्षामय करना,
हमने सोचा, मन में ठानी।
नानी वाली कथा कहानी,
अब भी जग में जगे सुहानी।



# विनोद

१. पत्नीला त्रासून पती घराबाहेर पडताच.
पत्नी:– कुठे जात आहात?
पती:– मरायला चाललोय.... सुसाईड करीन
पत्नी:– कुठेही जा. पण स्वेटर घालून जा. बाहेर खूप थंडी आहे. आजारी पडल्यावर तुमची खैर नाही.

२. मुलगा:– बाबा, गायास पाणी द्या ना?
बाबा:– स्वत: उठून घे.....
मुलगा:– प्लीज द्या ना बाबा...
बाबा:– आता थोबाडीत मारीन तुझ्या
मुलगा:– थोबाडीत मारायला याल तेव्हा येताना पाणी आणा.

३. डॉक्टर:– घाबरु नका देशपांडे... खूप छोट ऑपरेशन आहे.
पेशंट:– थंक यू डॉक्टर पण माझे नाव देशपांडे नाही
डॉक्टर:– मला माहित आहे. देशपांडे माझे नाव आहे.....

४. मास्तर:– १. त्याने भांडी घासली.
२. त्याला भांडी घासावी लागली
या दोन वाक्यात काय फरक आहे?
गण्या:– सोपं आहे.....पहिल्या वाक्यात कर्ता अविवाहीत आहे. आणि दुसऱ्या वाक्यात कर्ता विवाहीत आहे.

५. आज गण्याने परत एक कमाल केली बँकेत जाऊन झोपला कारण........?
तिथं लिहलं होतं. यहाँ सोने पर लोन मिलता है.

६. बायको– कशी दिसतेय मी?
नवरा– प्रियंका चोप्रा दिसतेयस......
बायको– खरच डॉन मधील का क्रिश मधली
नवरा– बर्फी मधली

७. बाई – हा टिव्ही कितीचा आहे भाऊ
टिव्हीवाला– ५५०००/– रु. चा
बाई– अरे, हा तर खूपच महाग आह अस काय खास आहे या टिव्हीमध्ये

८. गण्या:– पोलीस स्टेशनमध्ये गेला आणि त्याने तक्रार नोंदविली
गण्या:– साहेब मला फोनवर धमक्या मिळत आहेत.
पोलीस:– कोण आहे तो जो तुम्हाला धमक्या देत आहे.
गण्या:– एनएसईबी वाले, म्हणतात की, बिल नाही भरलं तर कापून टाकीन

९. डॉक्टर:– बाळा आ कर आ.
आई– त्याला फक्त इंग्लिश कळतं.
डॉक्टर:– बरं, बाळा ओपन योर माऊथ
आई:– थांबा, मी सांगते बाळा डु आ, डु आ...
कारण तो सेमी इंग्लिश आहे.

१०. महिला– दादा, जरा नीट रेट लावा
मी नेहमी इथेच साड्या घेते
दुकानदार– देवाला तरी घाबरत जा ताई कालच दुकान उघडलय

११. मुलगा– तू किती शिकली आहे?
मुलगी– काहीच नाही, मी कोर्स केलाय
मुलगा– कोणता?
मुलगी– डी.बी.एस.
मुलगा– म्हणजे काय?
मुलगी– धुणं, भांडी, स्वयंपाक

१२. मास्तर– हॉटेलमध्ये ठेवलेली झाडे वाढत का नाही?
संतोष– कारण, तिकडे वाढायला वेटर्स आहेत.

१३. बायको– बाजारातून दुधाची एक पिशवी घेऊन या आणि जर केळी दिसली तर ६ आणा नवऱ्याने दुधाच्या ६ पिशव्या आणल्या.
बायको– दुधाच्या ६ पिशव्या?
नवरा– हा, कारण बाजारात केळी दिसली होती.

१४.शिक्षक– जर कुणी शाळेच्या समोर बॉम्ब ठेवला तर काय कराल?
गण्या– १–२ तास बघणार कोणी मेला तर ठिक आहे नाहीतर स्टाफ रुममध्ये जमा करणार नियम म्हणजे नियम

१५. पोलीस– तुमचा नवरा कसा मेला?
स्त्री– विष खाऊन
पोलीस– मग त्याच्या अंगावर या मारल्याच्या जखमा कशा काय?
स्त्री– खातच नव्हता......

१६. नवरा– माझ्या पोटात खूप दुखायला लागलय, ताबडतोब ॲम्ब्युलन्स ला फोन लाव.
बायको– हो लावते, तुमच्या मोबाईलचा पासवर्ड सांगा.
नवरा– राहू दे थोडं बर वाटतंय आता.

१७. पुणेरी सुन– सासुबाई तुमचे सगळे दागिने मला द्या.
सासुबाई– मग मी काय घालू?
सुन–तुम्ही सुर्यनमस्कार घाला?
उत्तम आरोग्य हाच खरा दागिना.

१८. पुणेरी ग्राहक– शर्ट दाखवा
दुकानदार– ही पहा
ग्राहक– कितीला आहे
दुकानदार– फक्त ३५९०/–
ग्राहक– आता बाय १ गेट १ फ्रि द्या.
दुकानदार– का?
ग्राहक– कारण किंमत ऐकून अंगातला फाटला

**शेख शायनाज**
एफ.वाय.बी.कॉम

# सुविचार

१. आपले डोळे चांगले असल्यास आपण जगाच्या प्रेमात पडतो. पण आपली जीभ चांगली असल्यास संपूर्ण जग आपल्या प्रेमात पडते.

२. चांगले मित्र आणि औषधे ही आपल्या आयुष्यातील वेदना दूर करण्याचे काम करतात. फरक इतकाच की औषधांना एक्सपायरी डेट असते, पण मित्रांना नाही.

# शब्दांचा महिमा

आकांताने हाका घातल्या माझ्या
तेव्हा तेव्हा शब्दच धावून आले
माझ्या निरंतर निखाऱ्यांना
माऊली घ्यावे तसे पोटाशी घेतले
डोळ्यापुढे अंधारून आले तेव्हा
शब्दांचाच उजेडाने हात दिला.
एखादी आठवण आग घेऊन धावली
तेव्हाही शब्दांनीच हल्ला झेलला.
चिडूप चिडून सांडत होते ऊन
तेव्हाही शब्दांनीच सावली धरली.
दिवसाही दाटायचा अंधार तेव्हा
शब्दांनीच हातात बिजली दिली.
जगू न देणारे काही विसरायचे होते.
तेव्हाही शब्दांनीच तोल सावरला
मरणाच्या धारेत सापडलो तेव्हा
शब्दांनीच माझ्याकडे किनार सरकवला.

**भोर साक्षी विलास**
एफ.वाय.बी.कॉम

# चारोळ्या

१. नको धर्मकृत्ये पैसा खर्चूनिया
घेण्यासाठी विद्या तोच खर्चा।।
स्वत:चा उद्धार करा प्रयत्नाने
शक्तीने, मुक्तीने सुखी व्हावे।।

२. जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।
भुता परस्परें पडो। मैत्र जीवांचे
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो तें लाहो। प्राणिजात।

# साई बाबा

मेरा गेंदा–खिलौना रे
सोई मेरी छैना रे

झुला झुले सोने का
झुले रेशम की डोरी
मीठे सपनों मे खोई,

सुन सुन परियों की लोरी
मेरा दीठ–दिठौना रे
सोई मेरी छैना रे

चाँद सितारे जाग रहे,
नाच रही ही चांूदनिया
फुल खिले है चारँदी के

फूली मेरी आँगमिया
मेरा दीठ–दिठौना रे
सोई मेरी छैना रे

# खोज

मेरा सुख अनहोना रे,
सोई मेरी छैना रे
गीत सुनाऊ सोए तू,
तू सोए और गाऊँ मै
मेरा दीठ–दिठौना रे
सोई मेरी छैना रे
जागे, खेले, रूठे तू
हँस हँस तुझे मनाऊँ मै
खिलौनो की दुनिया की
सैर तुझे करवाऊ मैं
मेरी प्यारी सलोनी रे
साई मेरी छैना रे

# जरा सोचके बताओ

मैदान, गिरी, पनो मे हरियालिया लहराती
आनंदमय जहाँ है वह देश कोन सा है
जिसके अनंत धन से धरती भरी पडी है,
संसार का शिरोमणी वह देश कौन सा है
सबसे प्रथम जगत मे जो सभ्य था, रहेगा
जन–जन का दुलारा वह देश कौन सा है
नवक्रांति के पुजारी, सेवक, सपूत जिसके
भारत सिवाय दुजा वह देश कौन सा है

**डॉ.दत्तात्रय चव्हाण**
अर्थशास्त्र विभागप्रमुख

# विनोद लेखन

१. आई:– समजा तुझ्या एका खिशात दहा रुपये आणि दुसऱ्या शिखात वीस रुपये आहे. तर तू काय करशील?
चिंटू:– हा विचार करेन की मला तिसरा खिसा का नाही

२. एक विक्रेता पॅराशूट विकत होता.
विक्रेता:– विमानातून उडी मारा व फक्त पॅराशूटचे हे बटण दाबा आणि जमिनीवर सुरक्षितरित्या उतरा....

बंटी:– जर पॅराशूट उघडलेच गेले नाही तर.....?
विक्रेता:– मग पैसे परत घेऊन जा....

३. विनू शाळेत गेला व मुख्याध्यापक त्याला रागावले
मुख्याध्यापक:– काय हे विनू, तू एक काळा आणि एक पांढरा बूट घालून का आला आहेस? आधी घरी जा आणि बूट बदलून ये
विनू:– काय करु सर, घरीपण एक काळा आणि एक पांढराच बुट उरला आहे.

## सवय-कथा

एका मासाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंजऱ्यात ठेवलेल्या पोपटला चांगले खायला प्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येईल.

अखेर एके दिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटला खाणे देण्यासाठी पिंजऱ्याचे दार उघडले होते व त्याच्या हातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंजऱ्याच्या बाहेर निघून गेला.

पण लहानपणापासूनच पिंजऱ्यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना. कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती. म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते.

पिंजऱ्यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन वारा पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरुन गेला.

**तात्पर्य:-**

जास्त काळ पारतंत्र्यात (गुलामगिरीत) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते.

मग परक्याची भाषा, संस्कृतीस आपली वाटू लागते आणि मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठीची जिद्द अंगी राहत नाही. परक्या संस्कृतीचे चांगले काही घेताना आपल्या संस्कृतीचे विस्मरण होऊन न देणे हाच खरा शहाणपणा.

**प्रा.चक्कर छाया**
सहाय्यक प्राध्यापक

## जय जय हे भारत देशा

तू नव्या जगाची आशा जय जय हे भारत देशा
तपोवनातून तुझ्या उजळली
उपनिषदांची वाणी
मातीमधुनी तुझ्या जन्मला
नररत्नांच्या खाणी
जय युगधैर्यांच्या देशा जय नवसुर्यांच्या देशा

तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा
बळापुढे वा छळापुढे नच
इथे वाकल्या माना
अन्यायाला भरे कापरे
बघुनि शूर अभिमाना
जय आत्मशक्तीच्या देशा जय त्यागभक्तिच्या देशा

तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा
श्रमांतूनी पिकलेली शेते
पहा डोलती सुंदर
घामाच्या थेंबांतून सांडे
हृदयातील मंदिर
जय हरित क्रांतीच्या देशा जय विश्वशांतीच्या देशा

तू नव्या जगाची आशा, जय जय भारत देशा
पहा झोपड्या कंगालांच्या
थरारल्या भवताली
अंधाराला जाळीत उठल्या लाख मशाली
जय लोकशक्तीच्या देशा जय दलितमुक्तीच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय भारत देशा

**गाडगे वैष्णवी**
एफ.वाय.बी.कॉम

# आयुष्य-एक कला

आयुष्य जंगणं ही एक कला आहे.
कसं जगायचं हे ज्याचं त्याने ठरवायचं,
दु:ख सगळ्यांनाच असतात.
दु:खाला हसत जगायचं,
की दु:खात पिचत जगायचं
हे ज्याचं त्याने ठरवायचं,

उद्याच्या चिंता सगळ्यांनाच असतात,
पण उद्याची शाश्वती कोणालाच नसते.
उद्यासाठी आज मरायचं की
आजच्या दिवसांत संपूर्ण आयुष्य जगायचं

हे ज्याचं त्याने ठरवायचं.
समाजात जर आपलं अस्तित्त्व
टिकवायचे असेल
तर स्पर्धा अटळ आहे
पण ही स्पर्धा दुसऱ्याशी आहे
की स्वत:ची स्वत:शी हे
ज्याचं त्याने ठरवायचं

समाज हा दुसऱ्यांची
निंदा करण्यासाठीच असतो
कोणासाठी जगायचं...
स्वत:साठी की समाजासाठी
हे ज्याचं त्याने ठरवायचं


आयुष्यात सुखाचेही
चार क्षण येतात,
हिचभर सुखात सुख मानायचं,
की सुख वाटून वाढवायचं
हे ज्याचं त्याने ठरवायचं

कोणाच्या तरी आदर्शावर जगायचं,
की स्वत:चा आदर्श सोडून जायचं
हे ज्याच त्याने ठरवायचं

प्रत्येक सामान्य माणसांत
काहीतर असामान्य गोष्ट असतेच
सामान्य म्हणून जगायचं की
असामान्य म्हणून
हे ज्याचं त्याने ठरवायचं

जगण्यासाठी किडे मुंग्यांही
जगतात हो......
सावज म्हणून जगायच की
शिकारी म्हणून
हे ज्याच त्याने ठरवायचं
म्हणून सांगते......

**सरजिने निता शिवाजी**
तृतीय वर्ष वाणिज्य



# गुरुचा महिमा

जीवन हे मानवाला मिळालेली एक संधी आहे. तिचे सोनं करणं हे मानवाच्याच हातात आहे.

मानव जन्माला येतो तेव्हा आई त्याला मार्गदर्शन करते. नंतर शिकत असताना त्याचे शिक्षक त्याला मार्गदर्शन करतात व शेवटचा मार्गदर्शक हा गुरुच असतो.

आपण जन्माला का आलो? जन्म आपला कशासाठी झाला हे मानवाने समजावून घेतले पाहिजे. जन्माला आला हेला आणि पाणी वाहताच मेला. यासाठी माणसाला गुरुची आवश्यकता असते. कारण मानवाला या भवसागरामधून तरुन जायचं असेल तर त्यासाठी आवश्यक आहे. गुरुचे मार्गदर्शन, आपल्या गुरुच्या मार्गदर्शनानुसार चालणे, वागणे, बोलणे असे आचरण ठेवावे.

आपल्या जीवनामध्ये मानवाने नक्कीच एकतरी संतगुरु करणे आवश्यक आहे. त्याचेच मनन, चिंतन, नामस्मरण केले पाहिजे. परंतु गुरु असा नाही की, गळ्यात माळ घालतो. कानात मंत्र फुंकतो ह्याची मुळीच आवश्यकता नाही. उदा.साईबाबांना त्यांच्या गुरुने फक्त दोन नाणी दिली. ती होती श्रद्धा आणि सबुरी.

आपल्या गुरुवर फक्त श्रद्धा ठेवा व सबुरी करा. आपल्या गुरुचे नामस्मरण व आचरण गुरुप्रमाणेच असले पाहिजे. गुरुंचे भंडार हे भरलेले असतात. श्रद्धेमुळे त्यांची कृपा लगेचच मनावर होते.

समाजामध्ये वावरत असताना भक्कम आधार म्हणून आपल्या पाठिशी गुरुचाच हात असतो.
कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी।

या अभंगानुसार कर्महीही करत राहिले पाहिजे. तसेच मानवासमोर सर्वात महत्त्वाचा गुरु असते ती आई. आईची सेवा हिच ईश्वराची सेवा आहे. त्यामुळे आपल्या गुरुची पर्यायाने आईची सेवा. त्यांचे मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. तरच आपण मानवी जन्माला आल्याचे सार्थक होईल.

**कु.माधुरी डुकरे**
एस.वाय.बी.ए.

# आधुनिक म्हणी

१) जागा चार अर्ज हजार

२) प्रेमात पडला त्याचा धंदा बुडाला.

३) पुरुष तिन्ही जगाचा स्त्रिविना भिकारी

४) अभ्यास घटकाभर, दिवा रात्रभर

५) प्रेम थोडे, पत्र फार

६) रजिस्टर लग्नाला बेंड कशाला

७) साखरेचे खाणार त्याला डायबेटीस होणार

८) पडत्या सिनेमाला गाण्याचा आधार

९) कोर्टाचे काम, दहा वर्षे थांब

१०) भक्त गेला देवापाशी चित्त त्याचे चपलापाशी

११) बघावे नटाचे करावे स्वत:चे

१२) एकमेका लाच देऊ अवघे होऊ श्रीमंत

१३) नवरदेव रुसला अन् हुंड पाहून हसला

१४) आडला जावई सासऱ्याचे पाय धरी

१५) चुकलेले चिरंजीव चित्रपट गृहात.


**कु.वैशाली पोहकर**
एस.वाय.बी.ए.

# इंग्रजी विभाग

# "Art and History Interface"

Art is for playwright. Art reflects life of a society. Art holds up a mirror to society. On the other hand history means continuation of the past and present. The function of History is to construct the past and Interprete it. Historian should be faithful to facts. The aim f art is different. The aim of art is give to five esthetic pleasure and Transformation of life experience. Som creative writers do not invent story. they go to history for their art for example William Shakespeare always borrowed stories from history but he gave different inpretation play wright should go to history but he should come back to the rirtues of art, francies becon says.

"History Makes man wise



It shows that History has some functions. From the History we come to now that man has to learn the errors and mistakes committed by others in the past.

History deals only with the particular events which are the actual facts. But artist recreats something better than reality. His interest is human problem. As artistole says,

"The Function of poet is to tell
What may happen and not what has
happened"

It Means poetic truth tells what may happen and Historical truth tells what has happened. Artist can develop the Idea according to his Imagination. Because It is possible In art and not in History. It means the task of art is different from History. If Historian tries to change or Idealise the actual fact or events he would go away from the truth.

Like shakespear, Girish Karnad too dosen't invent stories. He borrows stories from Indian Mythology and history. He is really a creative artist. He goes beyond History, Creative artist makes thepast alive.

"Art is not history but
Spring from history and
reacts upon it."

**Miss.Pabale Rupali**
**T.Y.B.Sc.**

## Life..............

Life is an opportunity, benefit from it
Life is a beauty, admire it

Life is a dream, realize it
Life is a challenge, meet it

Life is a duty, Complete it
Life is a game, Play it

Life is a promise, Fulfill it
Life is sorrow, Overcome it,

Life is a song, sing it
Life is a struggle, accept it

Life is a tragedy, confrant it
Life is an adventure, dare it

Life is luck, make it
Life is too precious,
do not destroy it
Life is Life, Fight for it.

**Prof.Mangal Unavane**

# Basketful of Moonlight



O Moon.....
Give me moonlight
basketful or two baskets full
with seeds of moonlight.

From the city to my village,
on the sides of the path
I want to sow many,
small, small moons of light.

The whole village goes to city
daily to work.
It becomes dark on its way back
as my village is quit far.


The route is tough and full of
snakes and scorpions
Neither bus nor cart plies
when my father returns home

I am a sleep
And he goes back early morning
while I am sleeping.

O moon.....
Give me a basketful of moonlight
on loan
I want to sow seeds of moon
on the sides of the path

## There is Another Sky

There is Another Sky
Ever serence and fair,
and there is another sunshine,
though it be darkness there.
Never mind faded forests, nustis
Never mind slient fields
Here is a little forest,
Whose leaf is ever green
Here is a brighter Garden,
Where not a prast has bee,
In its unfading flowers,
I hear the bright been hum
Prithee, My brother,
Into my garden Come!



## Upon Westminster Bridge

Furth has not anything
to show more fair
Dull would he be of soul
who could pass by

A sight so touching in
its majesty.
this city now doth, like
a garment wear

the beauty of the morning,
silent, bare,
ships, towers, domes,
theutres, and templeslie

open unto the field,
and to the sky,
All bright and glittering
in the smokeless air

Never did sun mor
beautifully steep
In his first splendour,
Valley, rock or hill,

Never saw I never felt,
a culm so deep
the river glideth at his
own sweet will

Dear God, the very
houses sam alseep,
and all that might
heart is lying still

**Prof.Gorde Pravin**

# Comparisons

Fast as a spaceship
slow as a snail
Big as a dinosour
small as a nail,

fierce as a tiger,
gentle as a lamb.
Sour as a lemon.
Sweet as jam,
Dry as the desert,

wet as the sea.
Square as a house,
round as a pea.
Cool as a cave.
warm as toast,

Noisy as a road drill,
quiest as a ghost,
strong as an ox,
weak as kitten,
Dark as a rock,

Soft as a mitten,
Dark as a tannel,
light as the moon,
Night time midnight,
day time noon.

Tall as a giant.
short as an elf.
Cooked as a mountain path,
Straight as a shelf.....

The world is full of opposites,
so tink of some yourself!

**Ghode Neha**
S.Y.B.Com

# स्वावलंबन !

एक भिकारी था। वह सडक के किनारे बैठ कर भीक माँगता था। एक धनी आदमीको देखकर उसने भीक माँगने के लिए कटोरा बढा दिया।

धनी आदमी ने कहा, 'तुम्हारे पास इतने किमती हाथ है, फिर भी तुम भीख क्यो माँगते हो?' भिकारी बोला, 'सेठजी, मेरे पास धन होता, तो मैं भीख क्यों माँगता?' धनी आदमी ने कहा, 'अच्छा, मै तुम्हें पाँच हजार रुपये देता हूँ। तुम मुझे अपने दोनों हाथ दे दो।' भिकारी बोला, 'मै अपने दोनो हाथ आपको दे दुँगा, तो निकम्मा हो जाऊँगा।' इस पर धनी आदमी ने कहा, 'निकम्मे तो तुम अब भी हो। जो मेहनत की रोटी न खाए वह निकम्मा ही है।'

भिकारी को धनी आदमी की बात लग गई। उसने उसी समय भीख का कटोरा फेंक दिया और कमाकर खाने की कसम खाई। धनी आदमी ने खुश होकर उसे बूट पॉलिश का सारा सामान दिला दिया।

इश्वर ने हमें मेहनत करने के लिए ही ये हाथ दिए है। इनका उपयोग कर हमें स्वावलंबी बनना चाहिए।

**चासकर अश्विनी**
एस.वाय.बी.एस्सी

# Jokes

**Maths Teacher:-** What s a line?
**Pappu:-** A line is a don't that's going for a walk.
**Teacher:-** Then what are parallel lines?
**Pappu:-** A don't going for a walk with his

**Gawade Jaysing**
F.Y.B.A.

### Girlfriend

**Teacher :-**Behind every successful man there is a women what do we learn from this?
**Student :-** We should stop wasting time in studies and find a women

**Gawade Vishakha**
S.Y.B.Sc.

## Lifestyle

A rich man burst into laughter & said,
Life Is money.

A poor man troubled with cold & said,
Life Is struggle.

A lazy man dreaming in his sleep & said,
Life Is bed of roses.

A sadhu in his speech & Said,
Life is way of God.

A lower waiting anxiously for his beloved
said,
Life is love.

But I say that, life is an unsolved
mystery.

## Life Secrets

Count your life by smile
not tears

Count your age by friends,
Not Years

Life is a question without,
An answer.

Death is an answer without,
A question.

## Papa the great

My life is only for you
I come in this world.
Only for you,
Life is an ocean,
I'll cross this ocean
only for you,
life is a puzzle,
I Love this puzzle
only for you
Life is a challenge
I Accept this challenge,
only for you,
I Love You.
My dear PAPA.



## Good Thoughts.

Positive thinking is
one of the most important
aspect of success.

Life is like a NOTEBOOK
Two pages are already
written by GOD.
first page is birth and
last page is death.
center page are empty.
fill them with
smile and love.


## Account of Life.

Life is journal of all transaction
you enter into
life is ledger of recording
our timely growth
life is a trial balance of sorrow
and happiness.
life is a Balance Sheet of
hard work success.
The net result of your life
should be more profit of
wealth an never and
at loss of health.

## Life.......

Life is a definite goal,
Surely to be achieved.
Life is a never burden,
Which is to be heaved.
Life is a tough struggle.
as the elders say,
life is a no joke,
to be taught away.
Life is a contest.
to be won for sure.
Life is a no disease
So hard to cure.
Life is a journey,
comfortable to be made
Life is a nos such gamble,
which is to be played.

Jagtap Rohit
T.Y.B.A.



# Listen & Think.....!

When I ask you to listen to me
and you start giving me advice.
you have not done what I asked.

when I ask you to listen to me
and you begin to tell me why
I Shouldn't feel that way,
you are trampling on my feelings.

when I ask you to listen to me
and you feel you have to do something
to solve my problem.
you have failed me.
